वृक्षाचे मनोगत

कु. वैष्णवी रा. डांगरे बी.ए. भाग १

आपला हा परीसर संतुलीत आहे तो केवळ निसर्गामुळे आणि या निसर्गाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे वृक्ष मानवी जीवन हे पुर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. झाडे हि निसर्गाचा खूप महत्वाचा आणि अग्रेसर असलेला महत्वपूर्ण भाग आहे. आपल्या सभोवतालचे वातावरण आणि पृथ्वीवर सतत बदलत चाललेले निसर्गचक्र हे केवळ झाडामुळे संतुलीत आहे. म्हणून व्यक्तीच्या जीवनामध्ये वृक्षाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

मनुष्याला जगण्यासाठी तसेच पृथ्वीर असणाऱ्या सर्व सजीवांना जगण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा आणि हवा म्हणजेच ऑक्सीजनची आवश्यकता असते आणि सर्व गोष्टी आपल्याला मिळतात त्या केवळ वृक्षामुळेच त्यामुळे मानसाच्या जीवनामध्ये वृक्षाचे महत्व आहे, ते शब्दामध्ये मांडता येणार नाही एवढे मोठे आहे.

वृक्ष आणि मानुस याचे नाते आताचे नसुन खूप वर्षापूर्वीचे आहे हे संबंध परंपरेनुसार चालत आलेले आहे. झाडे सुर्यापासुन उर्जा आणि सुर्यप्रकाश घेतात व त्यापासून अन्न तयार करतात हे अन्न मनुष्य आपल्या दैनंदिन जीवनामध्ये खातो आणि जगतो. झाडांमुळे वातावरणातील हवा शुध्द राहाते झाडांमुळे वातावरणाचे चक्र संतुलीत राहाते आणि पाऊस ही जास्त पडतो. झाडाची हिरवीगार पाने आणि रंगबेरंगी फुले वातावरणाला सुंदर बनवतात.

खरोखरच झाडे आपल्या पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहेत जर या पृथ्वीवर झाडे नसती तर सजिव जीवन देखील असले नसते झाडाच्य सहवासात राहुन मानुस निरोगी राहातो परंतु आज आपण वृक्षाचे महत्व विसरलो आहोत आपण आपल्या स्वार्थासाठी मोठया प्रमाणात झाडांची कापनी करीत आहोत मोठी झाडे तोडून त्या जागी मोठया इमारती बांधल्या जात आहेत. ‘वृक्ष वाचवा, निसर्ग वाचवा’

स्वच्छतेचे महत्व

नाव : शिवानी गोपाल काळे बी. ए. भाग १

स्वच्छतेचे महत्व

स्वच्छता असे जेथे

आरोग्य असे तेथे

स्वच्छता हा आपल्या जीवनाचा एक महत्वाचा भाग आहे. स्वच्छता म्हणजे आपले शरीर मन व परिसर स्वच्छ ठेवणे स्वच्छता ही एक चांगली सवय आहे जी आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढवते आपल्यासाठी पाणी व अन्न जसे महत्वाचे आहे. तसेच स्वच्छता महत्वाची आहे असे म्हणतात. की 'जिथे स्वच्छता नांदते तेथे देव वास करतो' स्वच्छता हा आवश्यक गुण आहे. आपण सर्वांनी नियमित आपले घर परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे हे सर्व शांतीपूर्वक जीवन जगण्यासाठी गरजेचे आहे आपण व्यक्तीगत स्वच्छता इतकेच आपल्या घराची गावाची व देशाची स्वच्छता करणे आवश्यक आहे

आपण सर्वांनी नद्या नाले विहीरी तलाव इ. पाण्याचे स्त्रोत स्वच्छ ठेवायला हवेत घरातील परीसरातील कचरा हा कचरापेटीत टाकायला हवा आपण स्वच्छता ठेवली नाही तर अनेक प्रकारची रोगराई सर्वत्र पसरेल.

आपले घर परिसर स्वच्छ असेल तर आपले मनही प्रसन्न राहते. आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते. आपला वेळ व पैसा वाचले जातात स्वच्छ भारत अभियान हे भारताच्या स्वच्छतेसाठी सुरु करण्यात आलेले राष्ट्रीय स्तरावरील अभियान आहे.

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास

नाव : कु सलोनी उमेश शेंडोकार बी.ए. भाग १

आजच्या जगात आपण पाहत आहोत की पर्यावरणाचा दिवसेदिवस ऱ्हास होत आहे. त्याला कारणीभूत मानवच आहे मानव आपल्या स्वार्थासाठी झाडे कापतात झाडांपासून आपल्याला ऑक्सीजन मिळते फळे फुले शुध्द हवा व तसेच औषधी ही मिळतात तरीही आपण झाडे कापतो झाडे नष्ट होत असल्यामुळे ऑक्सीजनचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे. मानव मर्यावरणाच्या ऱ्हासाकडे वळत आहे झाडांची संख्या लोकसंख्येच्या तुलनेत अतिशय कमी होतांना दिसते तसेच वाहनांची धुळ ही सुध्दा मानवाच्या शरीराला व पर्यावरणाला घातक आहे प्रदुषणामुळे अनेक आजार माणसाला उद्‌भवतात आपण पाहतो की पर्यावरणाचे संतुलन बिघडलेले आहे कोणत्याही ॠतुत ऊन पाऊस थंडी पडते पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे.

पर्यावरण संतुलित असेल तर माणसाला पर्यावरणीय त्रास किंवा आजार निर्माण होणार नाही पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारखान्यातून निघणारा धुळ व झाडांची कमी होणारी संख्या वाहनापासून होणारे प्रदुषण इत्यादी बाबी कारणीभूत आहेत. आणि मानवही तेवढाच कारणीभूत आहे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी जेणेकरुन पर्यावरणाचे संतुलन बिघडणार नाही व मानवाचे आरोग्य ही सुदृढ राहील.

खेळाचे महत्व

तृष्णा रविंद्र पवार बी.ए.भाग १

मनुष्याला रोगांपासून दुर राहण्यासाठी निरोगी शरीर असणे आवश्यक आहे. एका निरोगी शरीरातूनच निरोगी मन व बुध्दीचा विकास होतो. शरीराला स्वस्थ ठेवण्यासाठी खेळाचं भरपूर महत्व आहे. खेळांमुळे शरीर व मन दोघेही निरोगी राहतात. खेळ खेळल्याने मुनष्यात धैर्य, सहनशीलता आणि मानवी गुणांचा विकास होतो. खेळ आजच्या व्यस्त जीवनात महत्वाची भूमिका बजावते. खास करुन विदयार्थ्यांच्या जीवनात खेळांचे महत्व भरपूर आहे. म्हणून प्रत्येक विदयार्थ्याला दिवसातून थोडा वेळ काढून खेळायला हवे खेळ खेळल्याने तंदुरुस्ती सोबत मनोरंजनही होते.

कोणताही खेळ खेळल्याने व्यक्तीचा शारीरिक विकासासोबत मानसिक विकासही होतो. खेळताना डोळे, मेंदू व शरीराच्या प्रत्येक अवयवाचा वापर करावा लागतो. खेळामुळे शरीराचे संतुलनही वाढते. नियमित कोणतातरी खेळ खेळल्याने चित्त प्रसन्न राहते. शारीरिक अवयवांचा व्यवस्थित विकास होतो. मनात उल्हास आणि उत्साह वाढून आयुष्यातील प्रत्येक क्षेत्रात यश मिळते.

खेळांचे देखील वेगवेगळे प्रकार असतात काही खेळ शारीरीक तर काही मानसिक असतात. शारिरीक खेळ खेळण्यासाठी शरीराला श्रम करावे लागते, तर मानसिक खेळांमध्ये मेंदूचे कार्य असते. फुटबॉल, हॉकी व्हॉलबॉल, क्रिकेट टेनिस, कबड्डी इत्यादी शारीरिक ताकत लागते. दुसरीकडे बुध्दिबळ, पत्ते, चौपट इत्यादी मानसिक खेळ आहेत, ज्याना खेळण्यासाठी मानसिक शक्तीचा वापर करावा लागतो.

या शिवाय इनडोर आणि आऊटडोर खेळांचे प्रकार आहेत. आजकाल इनडोर खेळांमध्ये कॉम्प्युटर व मोबाईल गेम्स मोठया प्रमाणात खेळले जात आहेत. परंतु हे खेळ तुमचे स्वास्थ सुधारणा ऐवजी बिघडवित आहेत.

बाहेर खेळला जाणारा खेड कोणताही असो तो आपल्या शरीराला स्वस्थ आणि मनाला प्रसन्न करतो. खेळ मनुष्याचा व्यक्तीमत्व विकास करतात. ते एकमेकांमध्ये सहकार्य व बंधुता वाढवतात. खेळामुळे परंपरा सन्मान आणि प्रेम देखील वाढते. अश्या पध्दतीने खेळ आपल्याला गुणवान, चारित्र्यवान आणि एक खरा व्यक्ति बनवतात.

प्रत्येकाला आपल्या जीवनात केव्हा ना केव्हा संकटाला तोंड दयावे लागते. कधी हार पत्करावी लागते. अश वेळी खिलाडूवृत्ती असेल तरच आपण पुढे जातो. अपयशाने खचून जाणाऱ्याच्या हातून काहीच घडत नाही. जशी हार, तशीच जीत हार झाल्याने खचून जाऊ नका. तसेच, जीत झाल्याने फुगुन जाऊ नका. असे सच्चा खेळाडू सांगतो. खेळातील हार संयमाने स्वीकारावी, तसाच जीवनातील विजयही विनम्रतेने स्वीकारावा.

डाँ. बाबासाहेब आंबेडकर

कु. दिक्षा रामेश्वर वानखडे बी.ए. भाग १

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रत्येक भारतियासाठी एक आदर्श व्याक्तिमत्व आहे. त्यांचे पुर्ण् नाव भिमराव रामजी आंबेडकर हे होते. डाँ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म महु या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी तर आईचे नाव भीमाबाई हे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लहानपनापासुन खुप हुशार व महत्वाकांक्षी होते. ते शालेय जिवनात १८ तास अभ्यास करत असत. त्यांनी बडोदयाचे महाराज सयाजिराव गायकवाड यांच्या आर्थिक सहायाने परदेशात जाऊन एम.ए. पी.एच.डी. या अर्थशास्त्र विषयात पदव्या मिळवल्या व बॅरिस्टर बनले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण माणसाला माणुस पण मिळुन देणारे अलौकिक व्याक्तिमत्व म्हणून ओळखतो महाड सत्याग्रह, काळाराम मंदीर प्रवेश, मनुस्मुती दहन, हिंदुकोड बील अशी इतर अनेक सामाजिक कार्ये केली. स्त्री वर्ग, शेतकरी, मजुर, पददलित, समाजाला त्यांनी समतेची वाट दाखवून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातिव्यवस्थे विरुध्द जोरदार लढा दिला. त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लक्षावधी अनुयायासह “बौध्द धर्म” स्विकारला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नी शिका संघटित व्हा हा अमुल्य संदेश समाजाला दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. त्यांचा भारतीय संविधानात सिंहाचा वाटा आहे. अशा या थोर महामानवाचे ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचेच नाहीत तर या विश्वाचे महामानव आहेत. त्यांची जंयती दरवर्षी १४ एप्रिल ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व पुण्यतिथी ६ डिसेंबरला महापरीणिर्वान दिन म्हणून साजरा करतो.

असे हे सर्वांना वंदनिय असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्यासाठी प्रेरणास्थान आहेत.

पाखरं

कु. योगिता राऊत बी.ए.भाग३

संध्या छाया होतांना

काळं कुट्ट आभाळ भासलं की,

पाखरं परततांत थव्या थव्याने

घरटयाकडे उदयाच्या आशेची

नवं स्वप्न घेऊन पंखात बळ आणून

चोचीत असतो त्यांच्या

किटुक मिटुक घरटयातल्या पिलांसाठी अन् उदयाची आशा जगविण्यासाठी

ना संचय ना कुठली चिंता डोळयात असते उदयाची अनभिज्ञता पाखरं किलबिल करतात

सुमधूर संगीत ऐकवितात जीवन आहे तो पर्यंत स्वच्छंदी जगतात अन् मरतांना क्वचितच दिसतात.

सूर्य संतापला तर.....

कु. वैष्णवी वि. गावंडे एम.ए. भाग १

जगात माणसाला नेहमी स्वत: च्या कर्तृत्वाचा फार गर्व असतो हे मी केलं ते मी केलं असे तो मोठयामोठयाने ओरडून सांगतो आणि त्यावेळी आपण खरोखर किती परावलंबी आहोत याचा त्याला विसर पडतो.

आता माणसाला जसे गर्व आहे तसेच सर्वानाच असतो आता सुर्याचीच गोष्ट पाहा ना भगवान सुर्यदेव आहेत म्हणून पृथ्वीतलावरील प्राणी जगू शकतात सूर्यापासून आपल्याला प्रकाश व उष्णता मिळते पण सूर्य आपल्याला देत असलेल्या सर्व गोष्टीची महती अतिपरिचयाने आपल्याला वाटेनासी होते समजा हाच सर्वदायी सूर्य आपल्यावर रागावला तर आणि आकाशात उगवलाच नाही तर सर्वत्र काळोख पसरेल चोवीस तास रात्रच रात्र काही दिवसांनी वातावरणातील उष्णता संपेल आणि अतोनात थंडी वाजू लागेल सूर्य उगवलाच नाही तर रोगराई वाढेल झाडांची वाढ खुंटेल सूर्य नाही तर पाण्याची वाफ कशी होणार वाफ नाही तर पाऊस कसा पडणार समजा सूर्य संतापला आणि संतापाने तो अधिक लालेलाल झाला तर त्याचे चटके माणसाला आणि सर्व प्राणिजगताला बसू लागतील

‘नको रे बाबा सुर्याचा संताप’

सुवर्ण कन्या : भगवानी देवी

कु. मेघा घाटे बी.ए. भाग ३

फिनलंड येथे झालेल्या वर्ल्ड मास्टर्स ॲथलेटिक चॅम्पिअनशिपमध्ये १०० मीटर स्प्रिंट स्पर्धेत ९४ वर्षीय भगवानी देवी यांनी सुवर्णपदक जिंकत जगात भारताची मान गर्वाने उंच केली आहे. याशिवाय त्यांनी दोन कांस्यपदकेही जिंकली आहेत. त्या युवा खेळाडूंसाठी प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत. वय हा फक्त एक आकडा आहे हे त्यांनी पुन्हा सिध्द केले आहे. या अनुभवी खेळाडून १०० मीटर अंतर अवघ्या २४.७४ सेकंदांत पूर्ण केले परंतु, ते २४ सेकंद साध्य करण्यासाठी एखादया खेळाडूने किती वर्षे तयारी केलीय, त्यासठी किती कठोर परिश्रम घेतले आहेत याबद्दल सहसा बोललं जात नाही. विशेषत: जेव्हा अशी कामगिरी करणारी एखादी महिला असेल तर ध्येय साध्या करण्याच्या तिच्या प्रवासाबद्दल फार कमी जणांना माहीत असतं. भगवानी देवींनी केवळ शारीरीक सक्षमताच दाखवलेली नाही तर तेवढयाच तीव्र इच्छाशक्तीचाही प्रत्यय दिला आहे. जिद्द प्रेरणा आणि लवचिकतेचंही उदाहरण त्यांनी आपल्या सर्वासमोर घालून दिले आहे.

कोणत्याही वयोगटातील खेळाडूला स्पर्धेसाठी करावी लागणारी तयारी शारीरीक आणि मानसिक अशा दोन्ही स्वारुपाची असते. शारीरिक प्रशिक्षणाबद्दल सर्वसामान्यांना सहसा माहिती असते, परंतु ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते ते म्हणजे मानसिक प्रशिक्षण शाळेतही पी.टी पीरियड हा नेहमीच शारीरिक प्रशिक्षणाचा असतो. तो कधी मानसिक प्रशिक्षणाचा भाग नसतो वास्तविकता तर ही आहे की हे मानसिक प्रशिक्षण शारीरिक प्रशिक्षणाइतकेच महत्वाचे असते. कदाचित काकणभर जरा जास्तच जेव्हा खेळाडू आणि त्याचा प्रसिस्पर्धी दोघेही थकलेले असतात त्या क्षणाला ज्याचं मनोबल जास्त त्याचा विजय पक्का इतकं हे साधं गणित आहे. या स्पर्धेत पदक जिंकून भगवानी देवी यांनी त्यांचंच मनोबल उच्च दर्जाचं असल्याचेच,सिध्द केले आहे.

म. जोतिराव फुले

कु. अंजू ब्राम्हणकर एम.ए. भाग २.

भारताचे थोर सुपूत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतिराव फुले यांची जयंती, महात्मा जोतिराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. सातारा जिल्हातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते, पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ओळखले जाऊ लागले. पुढे फुले हेच आडनाव रुढ झाले. जोतिराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १९४२ मध्ये त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुध्दीच्या जोतिरावांनी पाच-सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ संप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा

अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशुद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्याशोधक समाजाने गुलामगिरीविरुध्द आवाज उठवला आणि सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की,

विद्देविना मती गली

मतिविना नीती गेली

नितीविना गती गेली

गतिनिा वि-त गेले

वि-ताविना शूद्र खचले

इतके अनर्थ एका अविद्देने केले

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुब शिकते. जोतिरावांनी त्याच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाडयात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षेकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरुढ झाल्या शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरुढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले. त्याचप्रमाणे मुलीसाठी पहिली शाळा काढणारे पाहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतिराव फुले. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली.

मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले, पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राइट ऑफ थॉट्स् या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ मानला जातो. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.

भारतातील सर्वात पहिली स्त्री

कु. सानिका गाडबैल बी.ए.भाग ३

१.	राष्ट्रपती	- श्रीमती प्रतिभाताई पाटील
२.	डॉक्टर	- आनंदीबाई गोपाळ जोशी
३.	सर्जन	- डॉं. प्रेमा मुखर्जी
४.	वन्य प्राणी विशेषज्ञ	- ज्योती मेहता
५.	न्युक्लियस फिजीस्ट	- डॉं. विद्वा कोठेकर
६.	टी.वी. उद्घोषीका	- जयचंदी शम
७.	मुस्लीम स्नातक	- तायब्बा बेगम
८.	अंध स्नातक	- प्रतिमा आर्य
९.	वकील	- रेगीना गुहा
१०.	बॅरीस्टर	- कौनोलिया सोराबजी
११.	आर्मी अधिकारी	- सुहासीनी दास गुप्ता
१२.	बॅक मॅनेजर	- शांता कुमारी
१३.	ट्रेन ड्रायव्हर	- सुरेखा भोसले यादव
१४.	स्पीकर	- श्रीमती शन्नो देवी
१५.	मेयर	- तारा चेरियन
१६.	सांसद	- राधाबाई सुबारायन
१७.	सत्र न्यायाधीश	- अन्ना चांडी
१८.	राज्यसभा उपाध्यक्ष	- वॉयलेट अल्वा
१९.	राज्यसभा महासचिव	- वी.एस. रमादेवी
२०.	इंग्रजी लेखीका	- तोरु दत्ता

भारतातील राज्यांचे राज्यपाल भुषविणाऱ्या महिला

१.	सरोजीनी	- उत्तर प्रदेश
२.	पदम्जा नायडू	- पं. बंगाल
३.	विजया लक्ष्मी पंडीत	- महाराष्ट्र
४.	शारदा मुखर्जी	- आंध्र व गुजरात
५.	ज्योती वेंकटाचलम	- केरळ
६.	कुमुदबेन जोशी	- आंध्र

७.	रामदुलारी सिन्हा	- केरळ
८.	सरला ग्रेवाल	- मध्यप्रदेश
९.	चंद्रावती	- पाँडीचेरी
१०.	राजेन्द्रकुमारी वाजपेयी	- पाँडीचेरी
११.	शीला कौल	- हिमाचल
१२.	एम. फातीमा बीबी	- तामीलनाडु
१३.	व्ही.एस. रमादेवी	- हिमाचल
१४.	रजनी राय	- पाँडीचेरी
१५.	प्रतिभाताई पाटील	- राजस्थान

स्त्री म्हणजे कोण

१. स्त्री म्हणजे प्रेमाचा पर्वत.
२. स्त्री एक प्रेरक शक्ती आहे.
३. स्त्री म्हणजे मानवतेचा मान.
४. स्त्री ही संस्कृतीचं प्रतिक आहे.
५. स्त्री स्वभावत:च लज्जाशील आहे.
६. स्त्री म्हणजे सौंदर्याचं संघटन.
७. स्त्री एक कर्तव्याची माऊलीच आहे.
८. स्त्री म्हणजे विधात्याचं वैभव.
९. स्त्री म्हणजे कोमलतेचा कळस.
१०.स्त्री पुरुषात स्पर्धा नको, सहकार्य हवे.
११.स्त्री वर अन्याय म्हणजे पावित्र्यावर अन्याय.
१२.स्त्रीला स्त्रीचाच विरोध अधिक होत असतो.
१३.स्त्रीयांचा संपर्क हीच उत्तम शिलाची आधार शिला आहे.
१४.स्त्रीचे प्रेम म्हणजे पुरुषांच्या जीवनतील अमृत होय.
१५.स्त्रीचे जिवन हे पुष्कळ पाकळयाचं नाजुक फुल आहे.
१६.स्त्रीच्या संदर्भात ‘सौभाग्य आणि ‘ मातृत्व या गोष्टी अत्यावश्यक समजल्या जातात.

भारत जोडो यात्रा

कु.मिनल बनकर बी.ए.भाग ३

भारत जोडो यात्रा

कोटयवधी लोकांचे

स्नेह आणि आशीर्वाद

घेऊन निघालेत

राहूल बाबा तूम्ही!

कन्याकुमारी ते काश्मीर'

भारत जोडो यात्रा करायला

खरचं या यात्रेच्या निमित्याने

या देशातील वाढती

महागाई, बेरोजगारी

दारिद्रय, भांडवलवाद

दडपशाही याने बेजार

झालेला भारतीय माणूस

आज तूमच्या सोबत आहे.

या पूर्वीही निघाल्या होत्या

राजकीय पदयात्रा, चंद्रशेखर, लालकृष्ण आडवाणी,

वसुंधराराजे, राजशेखर रेड्डी, चंद्राबाबू नायडू

यात कोणी झाले पंतप्रधान तर कोणी मुख्यमंत्री

या सर्वापेक्षा आपले आणि आपल्या भारत जोडो

यात्रेचे वेगळेपण आहे.

'गांधी' नावचं काफी आहे

आणि या नावातच दया, क्षमा, शांती आहे.

स्वामी विवेकानंद

कु.साक्षी जामनिक बी.ए. भाग ३

एक ध्येय स्वीकारा आणि तुमचे जीवन त्याच्या ध्यासात रंगून जाऊ दया. ध्यानी मनी ,स्वप्नी त्याचेच चिंतन भरुन राहिलेले असू दया. मज्जा, स्नायू, नसा शरीराचे अंग, प्रत्यंग या सर्वातून त्या ध्येयाचेच स्फुरण असू दया. बाकी सारे काही सोडून दया. हाच यशाचा मार्ग आहे. महान संत, सत्पुरुष अशा ध्यासातूनच घडले. बाकी सगळे नुसतेच वाळवीर आहेत यश मिळविण्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती लागते. दिव्य ध्येयाकडे जाणारा तपस्वी असे म्हणतो की, ''मनात आणले तर मी सारा सागर पिऊन टाकीन माझ्या इच्छेने महापर्वताचे चूर्ण होईल'' असा उत्साह, इच्छाशक्ती प्राप्त करा अपरिमित श्रम करा. मग तुम्हाला असाध्य असे ते काय आहे?

विचार हीच आपल्याला कार्यप्रवण करणारी शक्ती आहे. श्रेष्ठ विचारांनी मन भरुन टाका रोज त्यांचेच श्रवण करा. नित्य त्यांचेच चिंतन करा. म्हणून परिस्थितीला दोष न देता कठोर परिश्रमाने व अदम्य इच्छाशक्तीच्या बळावर योद्ध्यासारखा पुरुषार्थ गाजविण्यासाठीच आपला जन्म आहे हे विसरु नका.

उठा, जागे व्हा.. आणि ध्येयसिध्दी झाल्यावाचून थांबू नका..

प्राजक्ताची अस्मिता : दैदिप्यमान सावित्रीबाई फुले

कु. मंजू ब्राम्हणकर एम.ए.भाग २

सातारा जिल्हयामध्ये खंडाळा या तालुक्यात नायगाव या गावामध्ये पेशवे काळात एका दैदिप्यमान महान सावित्रीबाई फुले यांचा जन्म ०३ जानेवारी १८३१ ला झाला. आईचे नाव सत्यवती आणि वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. सावित्रीबाई ही खंडोसे नेवसे पाटील यांचे पहिले अपत्य होय. यांच्या सोबत वयाच्या ९ व्या वर्षी झाला म्हणजे १८४० या वर्षी ज्योतीबा फुले यांचे वय १३ वर्षे होते सावित्रीबाईच्या शिक्षणाची सुरुवात १८४१ या वर्षापासून झाली. स्वत: शिक्षित होण्यासाठी एकुण सात वर्षे भिडे वाडयात मुलींची पहिली शाळा काढली या प्रकारे ज्योतीबा फुले

आणि सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक आणि तेवढेच सामाजिक अनमोल असे कार्य केले. 'स्त्रीमुक्ती' या सामाजिक शब्दाला खऱ्या अर्थाने शब्दबध्द करण्यासाठी स्त्रीमुक्तीच्या गाथेचा प्रथम अध्याय सावित्रीबाई फुले यांचा इतिहास पूर्णपणे ग्रहण करावा लागेल. भारतीय स्त्रियांच्या मनावर स्वातंत्र्याचे शिल्प कोरणारी पहिली महिला कोण? तर ती सावित्रीबाई फुलेच वरील प्रश्नाचे उत्तर अगदी प्रामाणिकपणे आणि जगजाहीरपणे भारतीय महिलांनी सांगितले पाहिजे. पेशवाईच्या काळात मनुवादी विचार प्रणालीने, विषमतेचे विष बहरलेले होते. अशा हया विषमतेच्या काळात माणसानेच माणसांचे माणुसपण पूर्णपणे नाकारले होते. तेव्हा त्या काळात दैववादी अंधश्रध्देने आणि आचार आणि विचाराने माण्सांच्या माणुसकीला सनातनी ब्राम्हाणांनी मानसिक गुलाम बनविले होते,

जातीयवाद तर आकाशाला हात लावत होता. अस्पृश्य लोकांचे जीवन जगणे हराम झाले होते. दारिद्रय, नैराश्यवाद, अज्ञानपणा अंधश्रध्दा, महामारी भुकमारी, स्पर्श, विटाळ हे हया भारत देशाच्या भूमिला लागलेले गंदे दाग, फक्त आणि फक्त शिक्षणानेच दूर होतील, असे सावित्रीबाई फुले आणि ज्योतीबा फुले यांना वाटत होते. सनातनी, ब्राम्हणांनी जे काहूर माजविले ते सावित्रीबाई फुले यांच्य समाजसेवेच्या मनोविश्वाने संपूर्णपणे नेस्तनाबूत केले. सनातनी ब्राम्हण लोकांचे बहुजन हित म्हणजे अस्पृश्य लोकांसोबत केलेले पूर्व नियोजित कट होते.

सावित्रीबाई फुले यांचा हेतू एकच होता तो म्हणजे मुलींना प्रेरित करुन प्रेरणा देण्याचा सुशिक्षीत करण्याचा ही संपूर्ण पुण्याई सावित्रीबाई फुले मुळेच घडून आलेल्या भारतीय स्त्रियांनी जगात आपले नाव रोशन केले. उदा. तानुबाई बिरजे, फातीमा बी शेख, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, प्रतिभा पाटील, सुनिता विल्यम पी.टी. उषा, मेरी कॉम,किरण बेदी, इत्यादी शिक्षणाचे दरवाजे उघडल्यामुळेच या सर्व स्त्रिया घडल्या हे सत्यच आहे. शिक्षणाचे दरवाजे जर आजही बंद असते तर आजही नांवे आणि त्यांची गौरवगाथा आपणास ऐकण्यास मिळाली नसती हेही तेवढेच सत्य आहे. सावित्रीबाई फुले मुळेच विविध क्षेत्रातील अनेक आणि अनेक महान स्त्रियांचा खरा इतिहास आपणासमोर त्यांच्या कर्तृत्वामुळे समोर आला आहे. सावित्रीबाई मुळे सामान्य जनमाण्सात जागृती निर्माण झाली. आज जनसामान्य माणूस चिकित्सा करायला लागाला. स्त्रिया वाचन करायला लागल्या, लिहायला लागल्या संपूर्ण विश्वाची माहिती ठेवू लागल्या. शिक्षणामुळे स्त्रियांच्य स्वतःच्या अस्तित्वाची आणि अस्मितेची जाणीव झाली. हे सर्वकाही एका आणि एका महात्म्याच्या आशिर्वादाने आणि पहिली महिला आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले मुळेच घडले.

१८९७ साली पुण्यामध्ये प्लेग नावाचा रोग आला. प्लेग झालेल्या दलित मुलाला आपल्या खांदयावरुन दत्तकपूत्र डॉ. यशवंत यांच्या दवाखान्यात आणतांना सावित्रीबाई फुले यांना ही प्लेग झाला आणि १८ मार्च १८९७ मध्ये वयाच्या ६६ व्या वर्षी निधन झाल्याने. डॉ. यशवंत हे ब्राम्हण विधवेकडून दत्तक घेतलेला मुलगा त्याकाळी डॉ. यशवंत हे भारतीय पहिले डॉक्टर आणि पहिल्या डॉक्टरची आई सावित्रीबाई फुले अशा या महान पहिली महिला आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले यांना कोटी कोटी प्रणाम !

बहिणाबाईच्या कवितेतील संसारगाडा :

कु. किरण ढोके बी.ए.भाग ३

''माजी माय सरसोती, मले शिकवते बोली

लेक बहिणाच मनी, किती गुपित पेरली'',

सरस्वती मातेची आराधना करणारी निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी खर तर एक निरक्षर शेतकरी महिला या अशिक्षीत महिलेच्या काव्यातून प्रकट होणारे तत्वज्ञान शिक्षितानाही लाजविणारे आहे. चार स्त्रिया एकत्र आल्यावर जसे जात्यावर ओव्या, गाणी म्हणवित अक्षर ओळख असणाऱ्या इतरांनी ती गाणी लिहून ठेवावीत आणि अवघ्या महाराष्ट्राला भुरळ पाडणारे काव्य प्रकट व्हावे केवढा हा अदभूत योगायोग गाणं ही बाहिणाबाईची सहज प्रवृत्ती होती आपण जे गातो ते 'काव्य' या संज्ञेस प्राप्त होवू शकतं याची पुसटशी जाणीव तिला नव्हती. जाणिवेच्या या नेणिवेमुळेच त्यांचे काव्य अजरामर आहे.

जळगावपासून दोन मैलावरील आसोले गावांतल्या 'महाजन' घराण्यातून जळगावच्या वतनदार 'चौधरी' वाडयात बहिणाईने खंडेरावांची सून व नथ्थूजी चौधरींची पत्नी म्हणून वयाच्या तेराव्या वर्षी प्रवेश केला. तेव्हापासून बहिणाईच्या मनातला माहेरच्या प्रेमाचा आठवणीचा एक संथ प्रवाह आपल्या गाण्यातून प्रगट होत होता. अनादी काळापासून आधुनिक युगापर्यंत स्त्रीमनाला अनिवार असलेले व विलक्षण मोह पाडणारे तीर्थक्षेत्र म्हणजे 'माहेर' बहिणाई आपल्या आईबद्दल म्हणतात.

''माय भीमाई माऊली, जशी आंब्याची सावली

आम्हाइले केलं गार, सोता (स्वत:) उन्हात तावली,

आणि वडील कसे - तर

''गावामंधी दबदबा, बाप महाजन माजा

त्याचा काटेतोल न्याव, जसा गावामंदी राजा,

भावानं वर्णन करतांना त्या म्हणतात,

धनामाजी लिखनार, गेला शिक्याले धुयात,

असे गाणे गात लगबगीने माहेरच्या वाटेवर असलेल्या या सासुरवाशीणीला मध्येच ठेचाही लागतात. तिथे वाटेवरच्या दगडालाही वाचा फुटते, बहिणाबाईच्या ओठातून तो दगड बोलतो,

''नीट जाय माय बाई, नको करु धडपड,

तुझ्याच मी माहेराच्या वाटेवरचा दगड,

केवढी रम्य आणि वास्तव कल्पना,

निसर्गकन्या बहिणाबाईच्या कल्पनेत विविधता आहे, नाविन्य व वेगळेपणा आहे त्या परमेश्वराचे सर्वव्यापकत्व सांगुन जातात.

''देव कुठे, देव कुठे भरीसनी जो मला

असे उरीसनी, माज्या माहेरात सामावला,

त्याचप्रमाणे सुर्य हा सृष्टीचा पोशिंदा आहे, हे ही त्या आपल्या काव्यातून व्यक्त करतात.

''असे देवाचं दर्शन, झालं आपसूक

हिरीदात सूर्यबापा, दावे अरुपाचा रुप,

घरोटा, संसार अशा कवितांमधून त्यांनी सहजीवनाच्या यशाचे गमक सांगितले आहेच, पण संसार हा तापलेल्या तव्यासारखा चटका लावणारा आहे. हे ही त्या सांगायला विसरत नाही.

''असे संसार-संसार, जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर,

संसारात एकमेकांच्या विचारांचा कसा आदर करावा ते बहिणाबाई पेक्षा योग्य रितीने कोण सांगणार१

''असे संसार -संसार, दोन जीवाचा विचार

देता सुखाला नकार आणि दु:खाला होकार,

असे संसार-संसार, दोन जीवाचा सुधार

कधी नगद-उधार, सुखदु:खाचा व्यापार,

संसार वेलीवर सुखदु:ख चा सामना करतांना, पतीनिधन झाल्यावर संसाराचा गाडा रेटणाऱ्या बहिणाबाई या खऱ्या आदर्श पत्नी होत्या. पती गेल्यावर आपल्या दोन लेकरांकडे पहात, ''रहायचे नाही हे स्वत:ला समजावित इतर स्त्रियांना समज देणारी स्त्री खरोखरच किती धिरोत्तत्र असली पाहिजे हे सांगणे न लगे,

ज्योतिष्यासारख्या थोतांडाला विरोध करुन-

''नको नको रे ज्योतिषा, नको हात माझा पाऊ

माझं दैव मले कये, माहया दारी नको येई,

असे ठणकावून सांगत आपल्या दैवात जे आहे. त्याला सामोरे जाण्याची त्यांची मनोवृत्ती वाखाणण्याजोगी आहे. कवयित्री बहिणाबाई या आपल्या कवितेतुन मनाचं वर्णन करतांना निरनिराळया उपमा देवून वर्णन करतात.

''मन जहरी जहरी, यांच न्यारं रे तंतर,

आरे इचु, साप बरा, त्याले उतारे मंतर,

बिहिणाबाई मनाला 'जहरी' म्हणत आहे. माणसाचं मन हे भयंकर विषारी, या विषारी मनाचं तंत्र वेगळच ''विषारी मनापेक्षा'' विंचु किंवा साप बरा, त्यांच विष मंत्राने उतरवता येते. पण मनाच्या विषावर कोणताच इलाज चालत नाही. विषारीमन कुणाचा बळी घेईल याचा नेम नाही. मनाची चंचलता व्यक्त करतांना त्या म्हणतात.

''मन पाखरुं पाखरुं, त्याची काय सांगू मात

मनाला त्या पक्षाची उपमा देत आहे. क्षणापूर्वी भुइवर असणारं पाखरु स्वाभविकपणे आकाशाकडे झेपावतं, तसंच मन हे सुध्दा अत्यंत गतिमान चंचल आहे, ते कधीच स्थितप्रज्ञ राहू शकत नाही. कष्टकरी व शेतकरी जीवन जगणाऱ्या निसर्गकन्या बहिणाई या आपल्या कवितेतून शेतीला बाजूला कशा ठेवतील?

''वढे नागर वखर, नही कष्टाले गनती

पिक शेतकऱ्याहाती, त्याच्या जीवावर शेती,

शेतीची साधने मोघडा, वखर, नांगर, तिफन, आऊत कोयप या सर्व शेतीपयोगी अवजारांचे उपयोग त्यांनी अगदी सोप्या भाषेत मांडून ठेवले आहे. पेरणी, कापणी, रगडणी उपणनी या प्रत्येक शेतकऱ्याच्या कष्टाचे जिवंत चित्रण त्यांनी आपल्या स्वयंस्फुर्त काव्यातून चित्रित केले आहे. आपल्या चोचीमध्ये एकेक गवताची काडी गोळा करुन कलात्मकतेने केलेल्या 'सुगरण' या पक्षाच्या खोप्याला शब्दरुप बहिणाईने दिले.

'खोप्यामंधि खोपा सुगरणीचा खोपा,'

आपल्या सहजसाध्य शब्दांनी भाष्यकरीत बहिणाबाई चौधरीचे काव्य देव्हाऱ्यातील नंदादिपाप्रमाणे सदैव तेवत आहे, त्यांची गाणी अक्षय, अजर व अमर होवून आज १३५ वर्षे झाली तरी रसिकांच्या हृदयात विराजमान आहेत. 'Poets are born, not made' ही उक्ती, बहिणाईचं काव्य वाचतांना सार्थ वाटते.

समाजप्रबोधनाचा सूर्य संत गाडगेबाबा....

कु सुहानी सुर्यवंशी बी.ए. भाग ३

सत्य बोलणाऱ्याला सत्यनारायण करायची आवश्कता नाही. सत्यनारायण करणारे अंधश्रध्दाळू, लोभी असतात. देवळातले देव खरे नसून लोकांची मदत करणारे, दीन-दुबळयांची सेवा करणारे खरे देव होत. पिंडदान, नवस, चमत्कार, जादूटोणे हे सर्व थोतांड आहेत. गाडगेबाबांनी याचा विरोध केला. हुंडा मुक्या जनावराची कत्तल, तिर्थयात्रा अशा विनाकारणच्या गोष्टीविषयी समाजाला बळी न पडू देता जागरुक राहण्यासाठी सतत प्रयत्न केले.

हाती फुटके मडके त्यात आभाळाची माया,

अभे आयुष्य वेचले गाव गाव फुलवाया,

होता रिक्षर जरी शब्द बोलला सदबोधाचा,

देह जाळूनी लावला दिवा समाजोध्दाराचा,

२३ फेब्रुवारी १८७६ रोजी जन्मलेल्या संत गाडगेबाबा यांचे २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. या विज्ञानवादी संताने विज्ञानाची पुस्तकंही वाचली नव्हती. मात्र त्यांच्या मेंदूत वैज्ञानिक द्ष्टीकोन ठासून भरलेला होता. प्रत्येक प्रश्नाचे चिकित्सक उत्तर देणे हा त्यांचा स्थायीभाव.

गाडगे महाराज देवळात जाऊन दर्शन घेत नव्हते, उलट धर्मशाळा बांधून दीनदलितांना, बेघरांना मदत करायचे देवाला नैवेदय, जेवण का देता? उघडया नागडयांना कपडे दया. देव की दिवा मोठा अशा अनेक उदाहरण व दाखल्यातून बाबा तत्कालीन सामाजाला वैज्ञानिक दृष्टीकोन पटवून दयायचे. त्यांनी १९०८ मध्ये पूर्णा नदीवर घाट बांधून घेतला, १९१७ मध्ये पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाळा बांधली, १९२५ मध्ये मुर्तिजापूर येथे धर्मशाळा, विदयालय बांधले, १९३१ मध्ये वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली, १९३२ मध्ये ऋणमोचन येथे सदावर्त सुरु केला. १९५२ मध्ये ८ फेब्रुवारीला ''श्री गाडगेबाबा मिशन'' स्थापन करुन महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था व धर्मशाळा स्थापन केल्या १९५४ मध्ये मुंबईत जे.जे. हॉस्पिटलला धर्मशाळा बांधली.

ज्यांना गाडगेबाबा कळले ते धन्य झाले. बाकी अंधश्रध्देच्या जाळयात कैद झाले. मला नाही माहित देव कुठे आहे ? जात, धर्म हे तर फक्त नावालाच आहेत. देवापेक्षा जास्त उपकार गाडगेबाबांचे आहे. बोलूनच नव्हे. तर प्रत्यक्ष कृतीतून अनेक विज्ञानवादी विचारांना सहजतेने पटवून देणाऱ्या महामानवाला त्रिवार वंदन.

गाडगेबाबा म्हणजे स्वच्छाता अभियानाचे जनक, समाज विदयापिठ, मानवतेचे पुजारी, फिरते व्यासपीठ, चालते बोलते संस्कारपीठ, संस्काराचा माथा, दीनदुबळयांची शाळा, विज्ञानवादी विचार, कर्मकांडाला मार, अंधश्रध्दा व देवपुजेवर आघात, डॉ. आंबेडकरांचे प्रेरणाथान, अशिक्षित

शिक्षणतज्ज्ञ, रोकडा धर्म सांगणारे, श्रेष्ठ समाज प्रबोधनकार, निष्काम कर्मयोगी, शुध्द विचारधन, देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करु नका, अडाणी राहू नका, पोथी पुराण मंत्र तंत्र देव देवस्की, चमत्कार अशा गोष्टींवर विश्वास ठेवू नका,

स्व. बाबासाहेब सांगळूदकर : एक दानशूर व्यक्तिमत्व

कु. पुजा वानखडे बी.ए.भाग १

असे म्हणतात की, माणसाच्या परिचयाची सुरुवात जरी चेहऱ्याने होत असली तरी, त्याची संपूर्ण ओळख ही त्याच्या विचार, वाणी आणि कर्मानीच होत असते. या विधानाच्या तंतोतंत कसोटीस उतरणारे व्यक्तिमत्व म्हणजे स्व. बाबासाहेब सांगळूदकर हे होत. सतत समाजकारणाचा ध्यास घेऊन लोकसेवेला, लोकप्रश्नाला प्राधान्य देऊन राजकारण करणारे स्व. बाबासाहेब सांगळूदकर सतत लोकसेवेत व्यस्त राहत होते. त्याच्या सामाजिक कार्याची पार्श्वभूमी फार मोठी आहे, त्यातील काही ठळक बाबींकडे लक्ष दिले तर कळून चुकेल की त्यांनी किती भरीव व महत्वाची लोककल्याणकारी कामे तडीस नेलेली आहेत.

स्व. बाबासाहेब सांगळूदकर यांनी खऱ्या समाज सेवकाचे व्रत महान कर्मयोगी संत समाजपुरुष गाडगे बाबांकडून घेतले होते. संत गाडगेबाबांचे नेहमीच सांगळूदकर जीन कंपाउंड मध्ये येणे जाणे असायचे. त्यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेला हा परिसर सांगळूदकरांच्या मनोभूमिला पोषक करणारा ठरला. त्याचप्रमाणे विदर्भातील थोर कृषी क्रांतिकारक स्व.डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाची ओळख झाल्यानंतर स्व. बाबासाहेब सांगळूदकरांच्या कार्याची धार आणखी तेज झाली. स्व. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या लोककल्याण कार्यात स्व. बाबासाहेब सांगळूदकर स्वतःहून सामील झाले. अमरावती जिल्ह्यातील सर्व खेड्यापाड्यात शिक्षण प्रसाराचे महत्वाचे कार्य त्यांच्या हातून पार पडले. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे या विचारातून समाजातल्या तळागाळातील माणसाला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे असा आशावाद घेऊन स्व. बाबासाहेब सांगळूदकर यांनी केलेल्या कार्याला गती लाभली. तसेच आपल्या कर्तव्य तत्पर स्वभावामुळे ते अधिकाधिक समाजाभिमुख होऊ लागले.

सोने जेवढे तापविले तेवढे ते अधिक चकाकते असा अनुभव स्व. बाबासाहेब सांगळूदकर यांच्या जीवन पैलूंवर प्रकाश टाकला तर नक्कीच येतो. विद्यार्थी दशेपासूनच त्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारलेली होती. त्यानुसार विविधांगी भूमिकेमधून स्व. बाबासाहेब सांगळूदकरांचे जीवनकार्य आपल्या समोर चित्र रूपाने स्पष्ट होते. उत्तम बॅडमिंटन खेळाडू ते हाडाचे शेतकरी असा त्यांचा जीवनप्रवास होता. शेतकऱ्याचे हितचिंतक व गोरगरिबाचे ते आधारस्तंभ होते. आपल्या अशिक्षित शेतकऱ्याला आधुनिक पद्धतीने शेती करता यावी, यासाठी परंपरागत विचार, रूढी यातून शेतकऱ्याला कसे बाहेर काढता येईल यासाठी त्यांनी भरीव प्रयत्न केले.

स्व. बाबासाहेब सांगळूदकर या जीवनरूपी रंगभूमीवरून दि. १३ जानेवारी १९६९ ला काळाच्या पडद्याआड गेले त्यांच्या पावन स्मृतिला माझे विनम्र अभिवादन !

शकुंतला परांगदा झाली......

कु. किशोरी गोळे बी.ए.भाग २

हो ! दचकलाना? शीर्षक वाचून काहीसा मनकल्लोळ उठेल की, "शकुंतला" हे स्त्रीवाचक नाम कुण्यातरी स्त्री विषयी असेल परंतु ही 'शकुंतला' म्हणजे मूर्तिजापूर ते अचलपूर या मार्गावर चालणारी 'नॅरोगेज रेल्वे' होय. नॅरोगेज याचा अर्थ असा की, सर्वात कमी असलेल रेल्वे रुळाचं मधलं अंतर गृहीत आहे. जसे की, नॅरोगेज, मिटर गेज, ब्रॉड गेज या प्रकारात रेल्वे गाडया रुळावरुन धावतानां आढळतात. या विषयी ग्रामीण भागात एक विनोदी म्हण सुध्दा विदर्भात मोठया प्रमाणात प्रचलित आहे. जसे की, 'नवरा बायकोचं नातं हे एखादया रेल्वे रुळाप्रमाणे असतं जे सोबत-सोबत राहतात, पण एकमेकांना कधीच भेटत नाहीत. कारण बरेचदा नवरा बायकोचे स्वभाव परस्पर विरोधी असतात.महत् प्रयासानं कधी-कधी एकमेकांशी रेल्वेच्या सांध्याप्रमाणं जुळवून घ्यावं लागतं, रेल्वेचा सांधा जुळवतांना एक लोखंडी उभा ठोकळा जरा ताकदीनेच ओढावा लागतो, म्हणजे सांधा एकमेकांशी जुळतो आणि रेल्वेचा मार्ग बदलतो. हे चित्र मानवी संसारातही आपणास पहावयास मिळते. नवरा बायकोला क्रोधाच्या वेळी असाच खाडकन सांधा बदलावा लागतो, तरच जीवनाची गाडी आणि घरी सुरक्षित राहते व पुढे चालू शकते.

इंग्रज भारतात आले आणि त्यांनी आपल्या सोबत काही नवं तंत्रज्ञानही आणलं त्यापैकी रेल्वेसेवा ह आज भारतभर पसरलेली आहे. स्वस्त आणि मस्त प्रवास हे भारतीय रेल्वेचं ब्रीदवाक्यंच आहे. स्वातंत्र्यापूर्व काळात म्हणजे १९४० च्या आसपास मूतिजापूर ते अचलपूर असा १३२ कि.मी. चा प्रवास शकुंतला करायची अत्यल्प तिकीट दराने चालणारी ही गोर-गरीबांची खरी लेकुरवाळी मायच होती. कुणी पैसे वाचविण्यासाठी कुणी विनातिकीट, तर कुणी भिकारी नेहमीच प्रवास करायचे. खूप दिवस शकुंतलेचे वाफेचे इंजिन होते पुढे काही काळ डिझेलचे इंजिन सुरु होते. परंतु या गाडीच्या प्रवासाचा आनंद राजू च्या बालपणीच खूप लुटता आला.

झुकं झुकं झुकु झुकं अगीनगाडी

धुरांच्या रेषा हवेत काढी पडती झाडे पाहू या मामाच्या गावाला जाऊ या..

हे बालगीत वजा कविता नुकतीच ऐकलेल्या राजूला ही कविता 'शकुंतलेसाठीच' आहे, असं वाटायचं ! मामाचं गावं म्हणजे आपल्याच मामाचे गावं होय असं खरं वाटायचं येथे शब्दांनी जणू अनुभूतीची जागा घेतली होती. लहानपणी राजू आपल्या आई सोबत अनेकदा या शकुंतलेनं प्रवास करताना त्याला या विशाल काळयाकुट्ट इंजिनाची फार भीती वाटत होती. दुरुन येणारी गाडी वारंवार पाहून ती कधी तिरकस झाली की, तीचं रंगीत लोभसवानं चित्र मनाला हरवून टाकायचं, पण जस जशी ती जवळ यायची तसं-तसं मात्र छातीत धड धड होत होतं, एकदा का गाडी आली अन् सर्व प्रवाशी गाडीत बसल की, एक जोरदार दीर्घ शिट्टी मारुन ती फुस-फुस धस-धस करत हळूहळू पुढे

सरकायची, नेहमी प्रवास करणारे, विनतिकीट असणारे काही हौसे प्रवाशी मुद्दामच वर चढायचे कधी-कधी तर विनाकरण या डब्यातून त्या डब्यात प्रवास करायचे हे सारं चित्रं ग्रामीण भारगात राहणाऱ्या राजूला नवीनच वाटाचं, तो जेव्हा पहिल्यांदा या शकुंतलेन प्रवास करायला लागला, तेव्हा त्याने पहिल्यांदाच या गाडीत 'टॉयलेट' असल्याचं त्याला जाणवलं तो मनोमन सुखावला, पाण्यासह सर्व सुविधा व वेळ प्रसंगी काही झालं तर गाडी थांबवण्यासाठी प्रत्येक डब्यात एक लाल रंगाची लाकडी मुठ असलेली साखळी पण होती. शेवटच्या डब्यात टी.सी. असायचा बहुतेक रोज ओळखीचे लोक असल्यामुळे विनतिकीट प्रवास करणाऱ्यांची संख्या ही जास्तच होती. त्या शकुंतलेमध्येच टी.सी.च्या डब्यात एक लोंखंडी पेटी व लहानशी मशीन होती, प्रवासी आला की टी.सी. माचीसच्या डब्याच्या आकाराची खाकी रंगाची जाड तिकीट तो मशीनमध्ये टाकून लोकांना देत असे.

इ.स. १९१३ ला शकुंतलेचा अधिकृत प्रवास सुरु झाला. ब्रिटिशांनी भारतातील सुपिक जमीन हेरुन खास करुन वऱ्हाड प्रांतात कापूस उत्पादनाला प्रोत्साहन दिले. येथील काळया कसदार सपाट जमीनीत चांगल्या प्रतीचा कापूस पिकू लागला. व्यापाऱ्यांच्या मदतीने 'शकुंतले' च्या सहाय्याने हा कापूस थेट मुंबई आणि कोलकत्ता बंदरातून पुढे इंग्लंडला पाठविला जाऊ लागला, त्यात शकुंतलेची भूमिका अत्यंत महत्वाची राहिली. "ले चली कपास, सामान और साग ! शकुंतला जल्दी जल्दी भाग!!" अशी विनोदी म्हण तेव्हा प्रचलित होती. अनेक आमदार, खासदार यांनी शंकुतला ब्रॉड गेज होण्यासाठी, तिची योग्य ती देखभाल करण्यासाठी अथक प्रयत्न केले, परंतु अमेरिकेच्या निक्सन ॲण्ड निक्सन या कंपनीच्या ताब्यात असल्यामुळे त्यांच्या प्रयत्नानां फारसे यश आले नाही. त्यापैकी खासदार सुदाम काका देशमुख हे एक होते. सुदाम काका कम्युनिस्ट पक्षाचे तत्ववादी नेते व ब्रम्हचारी होते. सुदाम काका सुध्दा आता हयात नाहीत, परंतु त्यांनी शकुंतलेचं नाव या रेल्वेला दिलं ते आजतागायत सुरु आहे.

झुक-झुक धावणारी शकुंतलेची चाके जुलै २०१९ पासून पूर्णपणे थांबली. रेल्वेरुळ ओसाड पडले, रेल्वे स्टेशन भकास दिसायला लागली आणि माणसांची गर्दी दिसेनाशी झाली. टवाळ पोरांचे टोळके रेल्वे स्टेशनच्या रिकाम्या इमारतीत बाकांवर बसून रिकामे चाळे करायला लागले आणि हे चित्र भकास दिसायला लागले.

शेवटी तिकडे शकुंतलेची चाके थांबली आणि इकडे राजूच्या डोक्यात आठवणींची चक्रे धडक-धडक आवाज करीत गतीने फिरायला लागली आणि शकुंतला परांगदा झाली.

पी.टी. उषा आख्यायिका आणि आव्हानं !

कु. साक्षी कुटेमाटे बी.ए.भाग १

गतवर्षीचं ऑलिम्पिक भारतासाठी क्रांतीच ठरलं. टोकियातील सात पदकं अभिमानास्पद. पण यापैकी भालाफेकीत नीरज चोप्रानं मिळवलेले सुवर्णपदक हे ॲथलेटिक्समधील युगारंभाचं धोतक. कारण या घटनेपर्यंत दोन हुकलेल्या पदकांच्या पुंजीची क्रीडा इतिहासात नेहमीच चर्चा व्हायची. यापैकी एक म्हणजे १९६० च्य रोम ऑलिम्पिकमधील ४०० मीटर शर्यतीत 'फ्लाइंग सिख' मिल्खा सिंग यांचं एक दशाशं सेंकंदान हुकलेलं पदक आणि त्यानंतर दोन तपांनंतर इतिहासाची झालेली पुनरावृत्ती ४०० मीटर अडथळा शर्यत लॉस एंजलिस ऑलिम्पिकमध्ये प्रथमच समाविष्ट करण्यात आली होती. त्यामुळेच उषाच्या पदकाविषयी भारताला मोठया आशा होत्या. पण तिच्या प्रयत्नांची दखल देशानं घेतली शालेय पाठयपुस्तकात आणि प्रशासकीय सेवा परीक्षेच्या प्रश्नांमध्ये तिची नोंद घेतली जाते. 'भारतीय ॲथलेटिक्सची राणी' 'उडनपरी' 'सुवर्णकन्य' 'रनिंग मशीन' अशा अनेक उपाध्यांनी ती आजही ओळखली जाते.

उषाच्या यशोगाथेप्रमाणेच तिची पूर्वकथासुध्दा संघर्षमय आहे. कोझिकोडच्या केरळ मेलाडी-पायोली भागातील कुट्टाली गावात उषाचा जन्म झाला. अठराविश्वे दारिद्रय आणि पोषणाचा अभाव हे पाचवीलाच पुजलं होतं. बालवयातील उषाच्या अचाट गुणवतेच्या बळावर तिला केरळ सरकारची अडीचशे रुपये शिष्यवृती मिळाली. त्यामुळेच कन्नूरच्या विशेष क्रीडा विदयालयात ती दाखत झाली. मग १९७७ च्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत ओ. एम.नाम्बियार हे उषाची क्षमता आणि गुणवतो पाहून भारावले. आणि तिच्या प्रशिक्षकपदाची सूत्रं आपल्या हाती घेतली हाच उषाच्या कारकींदीचा कलाटणी देणारा क्षण.

१९८० च्या मॉस्को ऑलिम्पिकमध्ये उषानं वयाच्य सोळाव्या वर्षी ऑलिम्पिक पदार्पण केलं. मग १९८२ ते १९९४ अशा चार आशियाई क्रीडा स्पर्धामध्ये चार सुवर्ण आणि सात रौप्य अशा एकूण ११ पदकांची कमाई केली. याशिवाय अनेक विक्रमसुध्दा प्रस्थापित केले. १९९१ मध्ये केंद्रीय औदयोगिक सुरक्षा दलातील निरीक्षक व्ही. श्रीनिवासन यांच्याशी ती विवाहबध्द झाली. त्यानंतर तिनं एक मुलाला जन्म दिला. ॲथलेटिक्समधून निवृत्तीनंतर उषानं देशासाठी ॲथलेटिक्सपटू घडवण्याचा ध्यास घेतला आणि उषा स्कूल ऑफ ॲथलेटिक्स' ची निर्मिती केली. अबिथा मॅन्युएल, जिस्ना मॅथ्यू. अथुल्या उदयन अशी गुणवता आता राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय स्तरावर चमकू लागली आहे.

बोलण्यातला वाढवू गोडवा

कु. अंकिता कुटेमाटे बी.ए.भाग१

भारतीय संस्कृतील प्रत्येक सण हा शरीरशास्त्र व मानसशास्त्राशी निगडित आहे. प्रत्येक सण साजरा करण्याची पध्दत ऋतुचक्रांचा, भोगोलिक वातावरणाचा विचार करुन केली आहे. उदाहरणच घ्यायचे, तर या रविवारी साजरा होणारा संक्रांत सण. खाण्यापिण्याची धमाल गुळाची पोळी, त्यावर भरपूर तूप, तिळगूळ मुगाची खिचडी आणि सर्वोच्च सुख म्हणजे गुरगुटया भात, तूप, मेतकूट अहाहा! या सणाचे सर्वात महत्वाचे देणे म्हणजे मानवी मनाला, आपल्यातील संवादाला गोड वळण लावणारे वाक्य: 'तिळगूळ घ्या गोड बोला असे म्हणतात, की उत्तम संवादकौशल्या असणाऱ्याची मातीही सोन्याच्या भावात विकली जाते. मौखिक संवाद हा थेट आणि निकटता निर्माण करणारा असतो ज्यात शब्द, देहबोली यांचा अंतर्भाव असतो. यामुळे व्यक्तीचे विचार, मन वळवणे, तर एखादयावर प्रभाव टाकणे या गोष्टी सहज साध्य होतात. एखादी व्यक्ती दिसायला खूप सुंदर अथवा दिमाखदार असते, पण ''तोंड उघडले ना की.. नको रे बाबा त्यांच्याशी बोलणे'' असे होते आपल्या बोलण्यावरच एखादे नाते जुळणे किंवा तुटणे अवलंबून असते.

देहबोलीबाबतचे संशोधन अल्बर्ट मेहराबियन म्हणतात, ''सत्तर ते ऐंशी टक्के संवाद देहबोलीतून होतो. उरलेला वीस टक्के मौखिक यातून शब्दसंग्रह म्हणे सात टक्केच वापरला जातो, या सर्व परिस्थितीत काळजी आहे ती आपल्या तरुण मित्र मैत्रिणींची नक्की किती टक्के संवाद करतात ही मुले आपण कधी हॉटेलात गेलो तर सर्व कंपू टेबलभोवती बसलेला असतो, पण डोकी मात्र मोबाईलमध्ये, तीच अवस्था प्रवासाची आता नक्कीच विचार करकायला हवाय संवादकौशल्याचा.

व्यावसायिक आयुष्यातही माणसे विविध पध्दतीने संवाद करत असातात. या संवादाचा नीट अभ्यास केला, तर जाणवेल ती आवाजाची लयबध्दाता योग्य शब्दांचा वापर व त्यांची फेक मन जिंकणारी असते, काही नेत्यांचे बोलणे रोखठोक बेधडक असते. ते असे बोलू शकतात कारण त्यांचा प्रत्येक विषयाचा खोलवर अभ्यास असतो. आकडेवारी मुखोद्‌गत असते आणि त्यातूनच निर्माण होतो प्रचंड आत्मविश्वास अनेक उदयोजक ठामपणे व नम्रपणे बोलतात कारण त्यांचा आपल्या व्यवसायावर उत्पादनावर आसणारा प्रचंड विश्वास म्हणजेच काय उत्तम संवादकौशल्याला हवा उत्तम दर्जा कोणत्याही विषयाचा सखोल अभास आणि सर्वांत महत्वाची सुसंस्काराची बैठक.

शिक्षणातून माणूस घडवू पाहणारा तत्वचिंतक

कु. अंजली चौधरी बी.ए.भाग१

आजचे आपले भारतीय सामाजिक वास्वव पाहिले तर तरुणांचे प्रश्न दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसते.त्यातच त्यांच्या ठायी मेटाव्हर्स सारख्या प्रति जगआभासी वअदृश्य जगाचे प्रलोभन वाढत आहे. वास्तव आणि आभास यातील सीमारेषा पुसट होत आहेत. परिणामी आजचा युवक दिशाहीन होत आहे नैराश्याला बळी पडत आहे. तो स्वत: मधले माणूसपण आणि स्वत्व दोन्ही हरवून बसला आहे.

अशा वेळी एक आधुनिक आदर्शवादी तत्वचिंतक म्हणून स्वामी विवेकानंदाचे तत्वज्ञान तत्वाज्ञान मूल्यात्मक आणि वास्तववादी असे व्दिस्तरीय आहे. त्यांनी सांगितलेला व्यावहारिक वेदान्त तत्वज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन शिकवतो. वास्तव जीनाशी मेळ घालतो. म्हणूनच ते उपाशीपोटी तत्वज्ञान नको' असे म्हणतात. आधी शरीराचे देणे दयावे नंतर मन बुध्दीचे लेणे घडवावे' या क्रमाने भारतीय समाजाने आपल्या जीवनाची वाटचाल करावी.

'नायमात्मा बलहीनेन लभ्य:' 'बलहिनाला आत्मप्राप्ती होत नाही' या मुंडक उपनिषदातील विचाराचा सिध्दांताचाते उध्दोष करतात. 'आधी शरीर कमवा मग मन आणि ज्ञान कमवा,' असे ते भारतीय युवकांना सांगत असत. भौतिक संसारी जीवनाची उन्नती करुन मग परमार्थाकडे वळावे तरच अर्थपूर्ण व समाधानी जीवनाची हमी मिळू शकते. अश तऱ्हेने अध्यात्म आणि जीवनव्यवहार या दोहोंत समन्वय साधून नवा भारतीय माणूस युवक मी सिंह आहे, मी ब्रम्ह आहे.' अशी गर्जना करणारा माणूस असला पाहिजे, म्हणजेच स्वात्वाचे भान झालेला असावा. म्हणूनच स्वामी विकांनदांनी माणूस घडविणाऱ्या शिक्षणाचा आग्रह धरला होता. आपण आधी घराचा आराखडा तयार करीत असतो, मगच घर उभे करीत असतो. नंतर ते सजवत असतो. त्यासाठी अमाप खर्चही करीत असतो. पण माणसाच्या 'बाळाला' असे घडवतो का शिक्षणाने रोजीरोटी मिळावी हे खरेच आहे, पण त्याचबरोबर माणसातला माणूसही घडला पाहिजे खरेतर बुध्दिशीलता विचारशीतला हे माणसाचे वेगळेगपण आहे तेच विकसित करणे त्याला आयाम देणे हे शिक्षणातून घडले पाहिजे, विचारशीलता म्हणजे विवेकशीलता विवेकाने वागणारा प्राणी तो माणूस होय.

एका बाजूला माणसातला 'माणूस आणि त्याच्यात असलेले 'पूर्णत्व' ही ओळख असा दुहेरी विकास शिक्षणाने झाला पाहीजे, म्हणजेच 'माणूस' म्हणून विवेकाने शहाणपणाने आणि स्वतंत्र ओळख निर्माण करुन माणसांच्या जगात वावरणारा माणूस घडला पाहीजे. विवेकानंदाचा हा विचार उन्नत भारतीय समाज घडविणारा ठरु शकतो.

गजर मराठीचा, अभाव ठोस कृतीचा

कु.गौरी शेवणे बी.ए.भाग ३

शिक्षण आणि मराठी भाषा हे समीकरण अमान्य करता येत नसले तरीही, शिक्षणाच्या बाहेरही एक प्रचंड असा लोकसमूह आहेच की, ज्यांचा 'मराठी' भाषा किंवा बोली सांभाळण्यात मोठा वाटा आहे. त्यांनी भाषा वाहती ठेवली आहे. या अशा मराठी भाषेला मात्र आपल्या शिक्षण व्यवहारात महत्व आणि ममत्व का दिलेले नाही, हा प्रश्न आहे.

अलीकडेच वैश्विकतेचा गजर करत मराठी भाषकांची दोन संमेलने झाली. एक मुंबईत राज्य सरकारच्या वतीने, तर दुसरे पिंपरीत जागतिक मराठी अकादमीच्या वतीने. मराठी भाषा आणि साहित्याचे हे असे उत्सव आपण नियमित भरवतो आणि मनसोक्त साजरेही करतो. परंतु जे मूलभूत प्रश्न आज मराठीला भेडसावत आहेत, त्यांच्या सोडवणुकीसाठी काही प्रयत्न होणार करत आहेत. पण त्यांचा परिणामकारकता वाढविण्यासाठी व्यापक प्रयत्न हवेत. नुसता वैश्विकतेचा झेंडा मिरविण्यात काय अर्थ आहे.

मराठी भाषेपुढच्या प्रश्नांचा विचार करताना पहिली समस्या ठळकपणे आज पुढे येत आहे ती म्हणजे मराठी शाळा बंद पडण्याचे भय. 'मराठी' घेऊन शिकणारे विदयार्थी महाविदयालयांमधून कमी कमी होत आहेत. विदयापीठांच्याही मराठी विभागांना विदयार्थिसंख्येची घरघर सतावत आहे. तर मराठी मुलांना कौशल्यज्ञानच नसल्यामुळे आज नोकरी अथवा संधी मिळत नाही या सर्वच्या सर्व बाजू स्वाभाविक सत्य असून त्या मराठी माणसाला अस्वस्थच करणाऱ्या आहेत तथापि ही अशी वेळ का आली किंवा मराठी विषयांत काय आमूलाग्र बदल केले पाहिजेत. किंवा मराठी बदलायची, म्हणजे नेमके काय करायचे किंवा संधी मिळविण्यासाठी आणि कौशल्ये आत्मसातकरण्यासाठी मराठीची नवी दिशा कुठली अशी असावी हे सारे प्रश्न अता लगोलग विचारामध्ये घ्यावे लागतील. ज्यामुळे मराठी विषयासंबंधी निश्चित काही एक आश्वासक स्थिती उत्पन्न होऊ शकेल. खरं म्हणजे मुळात नोकरदारांना पोसण्यासाठी केवळ मराठी नाही, हे पण विचारात घ्यावे लागेल. आणि शाळा महाविदयालये म्हणजेच काही ''मराठी जगवणारी प्रदान केंद्रें होत'', असाही भ्रम बाळगता कामा नये.

'गजर' अजिबात महत्वाचा नाही, असे कोणी म्हणणार नाही. पण, संमेलनानीच मराठी वागवली, जगवली. असे तरी सरसकट कसे म्हणता येईल किंवा चर्चा कार्यशाळा परिषदा यांच्यामधूनच मराठीवर थोर उपकार हे होत असतात. असे म्हणणेही खूप धैर्याचेच ठरु शकेल हे मराठीसाठीचे प्रयत्न मोलाचेच पण मराठीपणाचे सगळे श्रेय त्यांना देऊन भागत नाही तसे केले तर आम जनता जनार्दनांच्या भाषेवर अन्याय होईल. शेतबांधांवर बांधकामांवर गिरणी कारखान्यांत जे श्रमिक राबणारे एक हाडामांसाचे भव्य माणसांचे जग 'मराठी' बोलते, याचे आपल्याला वास्तव दृष्टीआड करता कामा नये.

आय हेट माय टीचर

कु. साक्षी राऊत बी.ए. भाग १

सिंधू आठ वर्षांची होती तेव्हापासून गोपीसरांच्या फॅक्टरीत ट्रेनिंग घेतेय. ते ट्रेनिंग सोपं नव्हतंच. शिस्त समर्पण आणि पूर्ण फोकस या त्रिसूत्रीचा हात धरुन तासनतास एकच शॉट गिरवत राहायचा आणि तो जमत नाही अशी तिथं कडक शिस्त. पहाटे ४ ला दिवस सुरु होणार, रात्री ८ ला लाइट ऑफ चॅम्पिअन नव्हे तर खेळाडू घडण्या-घडवण्याच्या एका प्रवासाची ही फक्त सुरुवात असते तिथे सिंधू म्हणजे माझ्यापेक्षा सरांचा माझ्यावर विश्वास जास्त आहे. त्यामुळे त्यांना ना माझ्या कष्टाची पर्वा आहे. ना रडण्याची न दुखण्याखुपण्याची. त्यंनी एकच गोष्ट शिकवली, मागे हटायचं नाही, हार मानायची नाही.

आय हेट माय टीचर वो मुझ पे चिल्लाता है.. ही इज द रिझन फॉर माय स्कार्स ही लाइक इट व्हेन आय स्वेट व्हेन आय फॉल व्हेन आय काण्टइव्हन ब्रिद ही इज द रिझन फॉर माय पेन ही डजण्ट केअर फॉर माय स्लीप आय हेट हीम बिकॉज ही नेव्हर गिव्हज अप आय हेट हीम बिकॉज ही बिलिव्हज इन मी मोअर दॅन आय डू इन मायसेल्फ आय हेट हिम बिकॉज ही इज आलवेज राइट... या ओळी म्हटल्या तर सिंधू आणि गोपीचंद या गरु-शिष्य जोडगोळीनं केलेल्या एका एनर्जी ड्रिकच्या जाहिरातीतल्या आहेत मात्र या ओळीत पी.व्ही. सिंधू आणि पुलेला गोपीचंद यांच्या नात्याचीच नाही तर एका चॅम्पिअननं दुसरा चॅम्पिअन घडवण्याची कहाणी सांगतात. खेळातली शिस्त आणि समर्पण सांगतात.

आणि ही गोष्ट सुरु होते तेव्हा सिंधू नावाची ही मुलगी फक्त आठ वर्षाची होती. शाळेत जायची बॅडमिंटन खेळायची. त्या काळात ती सिकंदराबादला राहयची. हैदराबादमध्ये नव्यानंच सुरु झालेल्या गोपीचंद अकॅडमीपासून ३० किलोमीटर लांब २००४ ची ही गोष्ट सकाळी शाळेत जायची आणि सायंकाळी तिचे वडील तिला प्रॅक्टिससाठी अकॅडमीत घेऊन यायचे. तेव्हा ही मुलगी चॅम्पिअन होईल आणि खेळात नाव काढेल असं कुणाला वाटलंही नव्हतं. तिच्यात टॅलेंट होंत. त्यात गोपीसरांची शिकवणी लागली तर उत्तम एवढाच तिच्या पालकांनी विचार केला होता. त्यामुळे ४ वर्षे सायंकाळी एवढया लांबून प्रॅक्टिसला येणं सुरु होतं. मात्र गोपीसरांनी सुचवलं की असं नाही चालणार बॅडमिंटनवर फोकस हवा म्हणून मग पुढची दोन वर्षे ती अकॅडमिंतच राहिली. मात्र घरच्यांशिवाय ही मुलगी फारच होमसिक होऊ लागल्यावर गोपीसरांच्य सांगण्यावरुनच सिंधूच्या पालकांनी अकॅडमीजवळ घर घेतलं आणि मग जरा गोष्टी सोप्या झाल्या.

शिस्त, फोकस आणि समर्पण हे सिंधूनंही इतकं प्रचंड प्रमाणात घोटवलं स्वत:त की अनेकदा विजयाच्या अगदी समीप येऊनही ती चॅम्पिअन झाली नाही. २०१३ पासून सलग २०१८ पर्यंत ती ब्रॉझ आणि सिल्व्हर मेडल जिंकत आली. यंदा मात्र ते जिंकन तोडून तिनं वर्ल्ड चॅम्पिअन म्हणून स्वत:ला सिध्द केलंच.

आणि सुवर्णपदक जिंकून दाखवलं साधेपणासह कष्टा आणि शिस्तीची झळाळी त्या सुवर्णपदाची शान वाढवते आहेच.

जिंकायंच कसं हे तस गोपीसर आपल्या विदयार्थ्यांना सांगतातच, पण जगायचे कसं याचे धडेही या अकॅडमीत प्रत्यक्षच दिले जातात. साधेपण सराव आणि ढोर मेहनत यापलीकडे कुणाला काही सुचू नये इतकं जिकिरीचं ट्रेनिंग हेच या फॅक्टरीच्या यशाचं गुपित आहे.

अंतराळात मानवी रोबोट

कु. साक्षी उंबरकर बी.ए. भाग १

अंतराळात आंतराष्ट्रीय अवकाश स्थानक (आयएसएस) दोन दशकांपूर्वी यशस्वीपणे कार्यरत झाले. या दोन दशकात विविध देशांच्या अनेक अंतराळवीरांनी इथे राहून आपापली शोधकार्ये उत्तम केली. मात्र यावेळी या अवकाश स्थानकाला एक अनोखा पाहुणा भेट देतो आहे. हा पाहुणा म्हणजे कोणी मानवी अंतराळवीर नसून, चक्क एक मानवी रोबोट आहे.

नुकतेच कझाकिस्तानच्या बायकोनूर कॉस्मोड्रॉम इथून रशियाच्या अवकाश संस्थेने या हयुमनॉइड रोबोटचं यशस्वी लॉँचिग केलं. स्कायबॉट एफ-८५० असं नाव या रोबोअला देण्यात आलं आहे. यानिमित्ताने रॉस्कोसमॉसने आपल्या अपडेटेट सूयोझ २.१ या अद्दयावत रॉकेटचीदेखील चाचणी पार पाडली. रॉस्कोसमॉसने केलेल्या ट्विनुसार ही संस्था पुन्हा एकदा आंतराष्ट्रीय अवकाश स्थानक शी डॉकिंग करण्याच्या प्रयत्नात आहे. यापूर्वी केलेला त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरलेला होता. मात्र आता या स्कायबॉटकडेच या यानाचे सारथ्य देण्यात आले होतं जे त्यानं यशस्वीपणे पार पाडलं. क्रू-मेंबर म्हणून त्याला पाठविण्यात आलं आहे मानवी अंतराळवीरांसाठी धोकेदायक असलेली अवकाश स्थानकाशी संबधित काही कामं या रोबोटच्या मदतीने करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठीच हा रोबोट रवाना झाला आहे. एका वृत्तानुसार स्कायबॉटचे वजन १६५ किलो असून, उंची ५ फुट ११ इंच आहे. या रोबोटला आर्टिफिशियल इंटेलिजन्सची देखील जोड देण्यात आलेली आहे. यापूर्वी हा रोबोट काही जाहिरातीमध्ये तसेच ऑनलाइन व्हिडीओमध्ये रेश्रक्यू ऑपरेशनसाठी शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण घेताना दिसला होता. Fedor Final Experimental Demonstration Object Research अशी व्याख्या करण्यात आलेल्या या रोबोटला काही योग्य ते बदल करुन उड्डाणाच्या वेळी पायलट सीटला चक्क बांधण्यात आले होते. अर्थात, त्याचं काम त्यानं चोख बाजावलंच. हा स्कायबॉट साधारण दोन आठवडे आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात राहणार आह. या काळात त्याला विविध अवजारे, जसे की स्पॅनर, अग्निशमनयंत्र यांचा उपयोग कसा करायचा यांच प्रशिक्षण देण्यात येईल यापूर्वी नसाने Robonaut 2 (R2) Robonaut 1 (R1) असे रोबोट्स आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात पाठवलेले होते.

आता हे रोबोट तिथं कसं काम करतात हे लवकरच दिसेल.

मानसी

कु. साजीया शेख बी.ए. भाग १

पॅरा बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदक जिंकून जिद्दीची नीव गोष्ट सांगणारी एक जिगरबाज कहाणी.

मानसी जोशी. मानसी म्हणजे जिद्द आणि निर्धार यांची एक भन्नाट कहाणी आहे. तिच्या जिद्दीसमोर सगळं सोपं वाटावं इतकं सहज वाटतं सारं. पण ते तसं नाही. २०११ साली एका अपघातात तिनं एक पाय गमावला. फिट राहण्यासाठी त्यांनतर तिनं बॅडमिंटन खेळायला सुरुवात केली. खरं तर आठव्या-नवव्या वर्षापासूनच ती बॅडमिंटन खेळत होती, पण ते खेळ म्हणून त्यात करिअर करण्याचा काही हेतू नव्हता. मात्र सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून सतत बैठे काम करताना तिला वाटलं की, आपण फिट राहण्यासाठी बॅडमिंटन खेळायला हवं. तिथून तिच्या बॅडमिंटन खेळण्याची सुरुवात झाली.

२०१५-२०१६ पासून ती स्पर्धा खेळत होती. पण त्यात फार यश मिळालं नाही. मात्र २०१८ साली तिनं एशियन पॅरा गेम्स या जकार्ता येथे झालेल्या स्पर्धेत ब्राँझ् मेंडलही तिनं जिंकलं. आणि यावेळी एसएल ३ कॅटगरीत तिनं पारुल परमारचं आव्हान परतवून लावलं. पारुल परमारही भारतीय त्याअर्थानं रौप्यपदकही या स्पर्धेत भारतानंच जिंकलं. मात्र पारुल अत्यंत अनुभवी खेळाड अर्जुन पुरस्कार विजेती. तिच्या खेळाचा दराराही मोठाच आहे. तसं पाहता फायनलमध्ये समोर पारुल उभी आहे हे पाहून मानसीवरही काही प्रेशर आलंच असेल. त्याविषयी मानसी सांगते, थोडा दबाव होता समोर पारु होती आणि तिच्या विरुध्द माझं रेकॉर्डही इतकं चांगलं नव्हतं. मात्र मी पहिला गेम जिंकला आणि मग माझा आत्मविश्वास बळावला. त्या आत्मविश्वासाची अजून एक महत्वची गोष्ट म्हणजे या स्पर्धेपूर्वी मानसीने एक महिना ब्रेक घेतला होता. त्या काळात तिनं गोपीचंद ॲकडमीत जाऊन विशेषा प्रशिक्षण घेतले त्या महिनाभरात स्वत:वर प्रचंड काम केलं आणि त्याचा तिला या स्पर्धेत फायदाही झाला.

मृत्यूजवळचा अनुभव

कु.निकिता भोपाळे बी.ए.भाग १

मृत्यूनंतर काय होते ते न सांगता येण्याजोगे सुंदर असून आपल्या कल्पना व भावना या सुंदरता सांगण्याच्या जवळपासही येत नाहीत. वेळेच्या बंधनात असलेला आपला हा जीव ज्या वेळी अनंत काळासाठी संपुष्टात येतो त्या वेळी मृत्यू त्याचे महत्व जराही कमी होऊ देत नाही. मृत्यूच्या जवळ जाऊन परत आलेल्या लोकांचे हे अनुभव आहेत. थोडयाच काळानंतर श्वासोच्छवास करु लागल्यावर जी माणसे परत जीवनात आली त्यांना प्रत्येकाला वेगवेगळे अनुभव येतात. सर्वसाधारणपणे शरीरातून बाहेर पडून तरंगणे, खूप वेगाने बोगदयातून जाणे व बोगदयाच्या शेवटी तीव्र प्रकाश बघणे, यासारखे अनुभव जवळपास सारखे असतात. प्राणवायूचा मेंदूला झालेला कमी

पुरवठा, मज्जातंतूंमधून मृत्यूच्या वेळी सोडलेली गेलेली जादा ऊर्जा आणि गुंगीच्या औषधांचा परिणाम ही कारणे जरी या अनुभवांसाठी देण्यात आली तरी पूर्ण निष्कर्षाप्रत आपण याबाबतीत येऊ शकत नाही. डॉ रेमंड मुडी, एलीझाबेथ कुबलर रॉस केनेथ रींग, मायकेल सेबॉम व मेलवीन मॉरीस यासारख्या संशोधकाचे असे म्हणणे आहे की,एन.डी.ई. हा प्रकार खूप मोठा आहे. जरी एन.डी इ. ची नोंद खूप वर्षापासूनची आहे. आताच्या एन.डी.ई. च्या नोंदी या आठव्या शतकांतील क्वटिबेटियन बुक ऑफ द डेड या पुस्तकांतील नोंदींशी मिळत्याजुळत्या आहेत. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी दिलेल्या दाखल्यांनुसार देवदूत, स्वर्ग व नरक या कल्पनाही एन. डी.ई.शी संबधित आहेत. जवळपास सर्वच लोक ज्यांना एन.डी.ई.चा अनुभव येतो ती आध्यात्मिक बनतात. त्यांचा स्वार्थ कमी होतो, भौतिकता कमी होते व ती समाजसेवी बनतात.

निरागसता सांभाळा

कु. प्राची खंडारे बी.ए.भाग १

तुम्ही जोपर्यंत काही तरी शिकत असता तोपर्यंत वृध्द होण्याची शक्यता नाही. चिरतरुण राहाल. वयाच्या या टप्प्यातून प्रत्येकाला जावे लागणार आहे. भगवंताने मध्येच उचलले नाही तर प्रत्येकाला तारुण्य व वृध्दापकाळाच्या अवस्थेतून जावे लागणार आहे. वयाच्या या टप्यांच्या पूर्वी लहानपण येते. लहानपणीचे वैशिष्ट्य म्हणजे निरागसता परमेश्वर प्रत्येकास निरागसता देत असतो. माणूस जगरहाटी करुन ईश्वराकडे परततो. तेव्हा ईश्वर त्याला एक प्रश्न जरुर विचारतो. जन्मासोबत दिलेली निरागसता मृत्यूनंतर परत केली की नाही त्याचे प्रमाण नाही. परंतु ईश्वराची विचारणा आपल्या सर्वांसाठी हा मोठा संदेश आहे. आपल्यात एक प्रकारची निरागसता कायम ठेवल्यास तारुण्यावस्था खूप परिपक्व होईल म्हातारपण मजबूत राहते नाही. मग निरागसता कशी सांभाळता येईल आजकाल तर लहानपणदेखील कालावधीपूर्वीच संपू लागले आहे. त्यासोबतच निरागसताही जात आहे. निरागसता कायम ठेवण्यासाठी एक काम करा. ईश्वरावरील विश्वास कायम ठेवा मदत करण्याची वृत्ती असली पाहिजे. शांत राहिले पाहिजे. अहंकार मुलीच बाळगू नका. या चार गोष्टींचे पालन करणे खूप महत्वाचे आहे. अर्थात अपेक्षारहित जगा. कोणाकडूनही अपेक्षा ठेवू नका. इतरांकडून असलेली अपेक्षा ठेवू नका इतरांकडून असलेली अपेक्षा माणसाला खूप अशांत करते. या पाच गोष्टींचे पालन केल्यास तुमच्यातील निरागसता कायम राहील. वयाच्या प्रत्येक वळणावर निरागसता सोबत असेल. निरागसतेसोबत तुम्ही बाह्य जगात आपल्या पात्रतेचाही उपयोग निश्चितपणे करु शकाल.

हेल्थ लायब्ररी

कु. भावना शेवतकर बी.ए. भाग १

कावीळचे मुख्य कारण कावीळ आजार नाही हा ताप किंवा छातीत दुखण्याचे एक लक्षण आहे याचे कारण वेगवेगळे असू शकतात. यामुळे तपासणी व उपचारही वेगवेगळे असतात. 'हेपेटाटिस' चा विषाणू 'ई','ए', 'बी आणि 'सी' मुळे 'व्हायरल इन्फेक्शन चे कारण ठरते. डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस, मलेरिया, टायफाईड, लिव्हर, एबसेस, टीबी आणि 'ऑटोइम्यून डिसऑर्डर' चेही कारण ठरु शकते. यासाठी काही तपासण्या महत्वाच्या ठरतात. ज्यांना लांब अवधीपर्यंत कावीळ असेल आणि सोबतच पेटात फ्ल्यूड रक्ताची उल्टी किंवा शैचातून रक्त जात असेल तर तत्काळ तपासणी गरजचे असते. मध्यम वयापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तीमध्ये कावीळचा संबंध लिव्हर कॅन्सर किंवा अन्य अवयवामध्ये टयूमर असण्याचे संकेत असू शकतात.

'लिव्हर फंक्शन' तपाणीसोबतच पोटाची अल्ट्रासाऊंड चाचणी काही प्रकरणात महत्वाची ठरते, रुग्णाला पाहून अन्य चाचण्या ठरविल्या जाऊ शकतात. सिकलसेल, थॅलेसेमिया, 'व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेमुळे रेड ब्लड सेल ला संपविले आणि कावीळचे कारण ठरते.

उपचार नाही हा एक गैरसमज आहे. आजाराच्या कारणांवर उपचार अवलंबून असतो. 'लिव्हर एबसेस' मधून पस निघणे स्टोन्स असलेला गाल ब्लडर सरकणे टीबी निरोधक औषधांचे बंद करणे यावर उपचार केला जातो. सिकलसेल आजारावरील विशिष्ट औषधांपासून उपचार व अॅटीव्हायरल औषधापासून विशिष्ट उपचाराचीही मदत होते. हर्बल औषधांना टाळायला हवे.

राज्यकर्त्यांच्या तावडीत घुसमटतेय मराठी भाषा

कु. पल्लवी येवले बी.ए. भाग २

पंधरा वर्षांपूर्वी तमीळ भाषेला अभिजात दर्जा दिला गेला. त्यांनतर संस्कृत, तेलगु, कन्नड, मल्याळम आणि उडीया यांनाही तो मिळाला. मराठीला हा दर्जा दयावा, अशी साहित्य अकादमीने एकमताने केलेली लेखी शिफारस मोदी सरकारने दुर्लक्षित केली आहे. राज्य सरकारही त्याबाबत संपूर्ण उदासीन आहे. मराठी भाषा, साहित्या, संस्कृती, शिक्षण हे सारेच विषय गेली ५ वर्षे विनोदाने विषय बनवले गेले आहेत. राज्यकर्त्यांच्या तावडीत सापडलेली मराठी तर अक्षरश: गुदमरते आहे. राज्यातल्या प्रमुख चारही पक्षांचे मराठीप्रेम पुतणा मावशीचे आहे. मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ मराठीचे २५ वर्षांचे धोरण, मराठी सक्तीचा कायदा आणि अभिजात दर्जा, या चारही बाबतात खात्याचे मंत्री विनोद तावडे हे निव्वळ बोलबच्चन ठरलेले आहेत. खरेतर, झेपत नसेल तर त्यांनी पायउतार व्हायला हवे.

तमीळ भाषेला अभिजात दर्जा मिळण्यात संगम साहित्याचा मोठा वाटा आहे. हे साहित्या २३०० वर्षे जुने आहे. कावेरी नदीवर धरण बांधले जात असल्याचा प्रसंग त्यात आला आहे. या धरणाच्या कामासाठी जगभरातून तज्ज्ञ मागविण्यात आलेले होते. महाराष्ट्रातील मराठी गवंडी मोठे कुशल असल्याचे वर्णन त्यात आले आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात वररुचीने प्राकृतप्रकाश हा व्याकरण ग्रंथ लिहिला. त्यात त्याने शौरसेनी, मागधी पैशाची व महराष्ट्री या प्राकृतभाषांचे व्याकरण सिध्द केले आधीचे सगळे नियम सांगून झाल्यानंतर शेवटचा महाकाव्यात अनेक मराठी शब्द आलेले आहेत. यज्ञाच्या वेळी पंडितांना मराठीत बोलायला बंदी घालण्यात आल्याची नोंद भागवत यांनी दाखवून दिलेली आहे संस्कृत ही धर्मभाषा असली तरी हे पंडित खाजगीत मराठीत बोलत असत हे यातून उघड होते. संत एकनाथांनी संस्कृत वाणी देवे केली मग प्राकृत काय चोरापासोनी झाली असे संतप्त उद्‌गार काढले होते. विंचू चावला ही एकनाथांची भारुडांची मराठी आजची अस्सल मराठी असूनही ते तिला प्राकृत म्हणतात कारण महाराष्ट्री प्राकृत हीच मराठी आहे. रघुनाथराव गोडबोले यांनी १८६३ साली प्रकाशित केलेल्या मराठी शब्दकोशाला महाराष्ट्रीय भाषेचा कोश म्हटले आहे, ते यामुळेच. मराठीचा अभिजात दर्जा मिळणे म्हणजे मराठीच्या जागतिक प्रतिष्ठेवर शिक्कामोर्तब होणे. तयामुळे मराठी माणसाचा न्यूनगंड कमी होईल. मराठी शिकवण्याची सोय देशातील ४५० विद्यापीठांमध्ये होईल. मराठीच्या समग्र विकासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी ५०० कोटी रुपये मिळतील. मराठी शाळा शिक्षण, शिक्षक यांची दर्जावाढ वाचन संस्कृती वाढणे ग्रंथालये संवर्धित केली जाणे, मराठी पुस्तके स्वस्तात मिळणे मराठी मुलामुलींना अधिकाधिक रोजगार मिळणे यासाठी या दर्जामुळे खूप मदत होईल. मराठीचे गोमटे व्हायला अभिजात दर्जा गती देईल.

देशसेवा

कु. ऐश्वर्या कळस्कर बी.ए. भाग २

भारतात स्वातंत्र्याची चळवळ जोरात चालू होती. महात्मा गांधीच्या सांगण्यावरुन हजारो देशप्रेमी तरुण प्राणाची पर्वान करता स्वातंत्र्या आंदोलनात उतरले होते. महात्माजींना अटक झाली. तुरुंगात असताना त्यांच्या पत्नी कस्तुरबा खूप आजारी आहेत. असे वृ-त त्यांना कळले. तरीही त्यांचे चित्त थोडेही विचलित झाले नाही. जेलर एकदा महात्मा गांधींना म्हणाला, ‘तुमची पत्नी खूप आजारी आहे’. तुम्ही आपल्या अपराधाची क्षमा मागा. मी तुम्हाला घरी जाऊन तिला भेटण्यास परवानगी देईल’’. महात्मा हसत म्हणाले ‘‘या क्षणी मी पत्नीच्या सेवेपेक्षाही देशाची सेवा श्रेष्ठ मानतो. संकटसमयी माण्साने जसा धर्म सोडू नये तसे स्वातंत्र्याचं व्रत पण सोडू नये. हाती घेतलेले कार्य पूर्ण करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. जर मी कर्तव्यात टाळाटाळ केली तर ती देशाची फसवणूक होईल.’’ राष्ट्रपिता महात्मा गांधींसारख्या दृढनिश्चयी, देशप्रेमी व देशसेवी व्यक्तीमुळेच या देशाला स्वातंत्र्याची मधुर फळे चाखवयास मिळाली.

योग्य तरुण

कु. राधीका लांडे बी.ए. भाग २

राजा यशपालच्या दरबारात तीन तरुणांनी प्रवेश मिळवून उद्वोगधंदा काढण्यासाठी भांडवल म्हणून काही पैशांची मागणी केली होती. राजाने सांगितले की, ठिक आहे. परवाच्या दिवशी तुम्ही दरबारात या पण दुसऱ्याच दिवशी राजा वेषांतर करुन त्या तरुणांच्या गावी गेला. त्याने येण्याजाण्याच्या वाटेत भलामोठा दगड व त्याच्याखाली एक मोहोरांची पिशवी ठेवली. आता तो निरिक्षण करीत राहीला. काही वेळाने ते तरुण काम शोधायला त्या वाटेने निघाले. पहिला तरुण ते तरुण काम शोधायला त्या वाटेने निघाले. पहिला तरुण त्या धोंडयाला चांगलाच ठेचकाळला व शिव्या देत पुढे गेला. दुसरा तरुण ही कुणी ब्याद रस्त्यात ठेवली म्हणून वळसा घालून गेला. तिसरा तरुण त्या दगडाशी आल्यावर थांबला व म्हणाला असे या दगडाचा सर्वांना त्रास होणार, तेव्हा आपणच हा दगड हलवूया, त्याने प्रहार उपब्ध करुन तो वाटेवरचा धोंडा हलवला तर काय एक मोहोरांची पिशवी त्याला मिळाली. तिसऱ्या दिवशी सापडलेल्या मोंहोरांविषयी सर्व बातमी त्याने दिली व सांगीतले. ज्याचे धन त्याला परत दया. आता तिघेही तरुण दरबारात पैशांच्या मदतीसाठी आले होते. राजा म्हणाला, मित्रांनों मी नेहमी योग्य माणसालाच मदत करतो आणि केलीही आहे. जो कष्टाची लाज न बाळगता सदैव, कष्ट करण्यास तयार असतो तोच धंदयात यशस्वी होवू शकतो. असे म्हणून राजाने ती मोहोरांची पिशवी तिसऱ्या तरुणाच्या हाती सन्मानाने दिली.

अस्थिरतेच्या कडयावर......

कु. जया बिजवाडे बी.ए.भाग ३

आपण सध्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात जगत आहोत ही स्पर्धा बऱ्याच कारणांमुळे संथ. पण निश्चितपणे उग्र रुप धारण करीत आहे. प्राण्याची तगून राहण्याची, संसाधने बळकावण्याची व आपल्या खास हक्काच्या फायदयाची जागा निर्माण करुन ती राखून ठेवण्याची मूलभूत नैसर्गिक प्रवृत्ती आणि तत्सम गोष्टी यास कारणीभूत आहेत. गेल्या हजारो वर्षांत मानव प्राणी आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन करण्यास शिकला, निसर्गात उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या उपयुक्तेत भर टाकण्यास शिकला आणि आपल्या स्व-संरक्षणाची व आरामदायी जागण्याची साधने निर्माण करणेही शिकला. या प्रक्रियेत मानवाने सृष्टीतील इतर प्राणिमात्रांना व निसर्गालाच नव्हे तर आपल्यातल्या कमकुवत वर्गालाही अपरिमित हानी पोहोचवली आहे.

अर्थात विवेकी माणसांचे विचारी मन यांच्या समांतर रेषेत विकसित झाले. त्यांनी निसर्गाप्रति व सहबांधवाप्रति अधिक सर्वसमावेशक व अधिक संवेदनशील होईल अशा मानवतावादी समाजास आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या जवळचे दुसऱ्यांना वाटून देण्याची प्रवृत्ती स्वत:च्या

कुटुंबापर्यतच मर्यादित न ठेवता ती मोठया क्षेत्रात विस्तारली. यातून मानवी संस्कृती निर्माण झाल्या व उच्च मानवी मूल्ये जन्माला आली. भारतात आपल्या वैभवशाली परंपरेतील वसुधैव कुटुंबकम 'विश्वस्त वृत्ती' शांततामय सहजीवन व अशाच उच्च संकल्पनांचा आपल्याला अभिमान वाटतो.

समाज या परिस्थितीत, मला वाटते की, हा संघर्ष अधिकाधिक तीव्र होत जाणार आहे. हवामान बदलाचा राक्षस आपल्यापुढे आ वासून उभा असताना एकीकडे आपण जागतिक पर्यावरण अस्थिरतेच्या कडयावर उभे आहोत तर दुसरीकडे आपल्यापुढे 'आहे रे' व 'नाही रे' या वर्गातील संघर्ष उभा ठाकला आहे. सुदैवाने आपण ज्ञानाच्या युगात वावरत आहोत. औदयोगिक युगाच्या तुलनेत ज्ञानाचे तंत्रज्ञान हे आर्थिक कार्यक्रमांच्या विकेंद्रीकरणास व लोकशाहीकरणास अधिक पोषक आहे. नागरी-ग्रामीण दरी तसेच श्रीमंत गरीब दरी आता तुलनेने सहजगत्या भरली जाऊ शकते. तरुण लोकसंख्येचा लाभ असणाऱ्या भारतासारख्या देशाने ही संधी दवडता कामा नये. आपल्यासारख्या महाकाय देशाने पृथ्वीचे संतुलन राखण्यासाठी कृती केली पाहिजे व त्यासाठी ज्या मानवी बुध्दिचातुर्याचा वापर करुन आपण आजवरची मार्गक्रमण केली, त्याचा समुचित वापर केला पाहिजे. यासाठी पृथ्वीच्या कमीत कमी संसाधनांचा वापर करुन वाढत्या मानवी गरजा भगविणे, मानवी उपभोग अधिक न्याय कारणे व पृथवीच्या पोषण करण्याच्या क्षमतेच्या मर्यादेत पृथ्वीच्या संसाधनांवर भार टाकणारी चक्राकर अर्थव्यवस्था निर्माण करणे या गोष्टी अंगीकारण्याची गरज आहे. ही आव्हाने अशी आहेत की जी सुधारीत विज्ञान तंत्रज्ञान व मानवी समजूतदारपणाच्या आधारावरच पेलली जाऊ शकतात. तेच धाडस दाखवून आपण आपले याबाबतीतले अल्प कर्तव्य पार पाडणे, एवढे तरी किमान आपण करुया.

मानवतेसाठी विवेकवाद

कु. तेजल धाबे बी.ए. भाग ३

सध्या जगातल्या बहुतेक सर्व भागात दोन प्रकारचे दावे सहसा ऐकायला मिळतात

एक: विकेकवादाची कधी नव्हे एवढी आज गरज आहे

दोन : ज्यांच्याविष्ज्ञी तत्वज्ञानात बोलले जाते तो विवेकी पशू मानवप्राणी खात्रीने नाही आणि विशुध्द विवेक ही निव्वळ दंतकथा आहे.

या दोनही दाव्यांच्या बाजून काही ना काही तरी बोतला येईलच तरीही अर्थातच, या दोहोत कटुभव तणाव आहेच. गेल्या कित्येक शतकातल्या अनुभवावरुन आता आपल्याला कळून चुकले आहे की आपण काही निर्ममपणे विशुध्द विचार करु शकणारे अमूर्त आत्मे नाही आहोत. उलट आपण भिन्न संदर्भ, विविध भावनोद्रेक, बोधनात्मक पक्षपात, गृहीतके आणि पूर्वगृह या साऱ्या घटकांमुळे सतत प्रभावित होत असतो बऱ्याच वेळा आपण स्वत:च्या उत्तम निर्णयाविरुध्द व

आपल्याच हिताविरुध्दा कृती करत असतो. आपला वस्तुनिष्ठपणा आपल्याच व्यक्तिनिष्ठतेपुढे लोटांगण घालतो म्हणूनच विशुध्द विवेकवादाचा दावा करणे हे बालिश आहे, असा प्रतिवाद केला जातो.

आपण सारे विवेकवाद व मानवतावाद यावरील या समेलनांत सहभागी होत असल्याने आपण पहिल्या दाव्याशी सहमत होणारे आहोत. त्यामुळे अधिक विवेकीपणा हा सगळया जगाकरीता चांगला ठरेल, या मताचे असू पण मला अशा शंका येते की वेगळया संदर्भात विवेकी असल्यामुळेच, दुसऱ्या दाव्यात अनुस्यूत असलेली टीका आपण मान्य करु. विवेकवादात भाबडया विशुध्द विवेकीपणाची कल्पना अंतर्भूत असण्याची गरज नाही सरते शेवटी विज्ञान व विचारीपणच आपल्याला सांगतो की, आपण म्हणजे विशुध्द आत्मे नसून कडक कवटीतले सच्छिद्र मेंदू आहोत. मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व इतर तज्ज्ञ मंडळी आपल्या विवेकाचा चंचलपणा तपासू व मोजूही शकतील. त्यांना असे आढळून येईल की आपण तर्कविसंगत निष्कर्ष काढतो आणि निर्णय घेताना आपण विवेकहीन गोष्टींनी विवेकीपणाची स्खलनशीलता न स्वीकारणे हेच आपल्या विवेकीपणाचे अपयश असेल. मग जगाला अधिक विवेकीपणाची गरज आहे. आणि आपला विवेकीपणा हा अनेक उणिवांनी भरलेला आहे, या परस्पराविरोधी विधानांवर आपण विश्वास ठेवायला तयार आहोत का?

मला वाटते हे दोनही दावे आपण विशिष्ट प्रकारे समजून घेतले तर आपण असा विश्वास ठेवू शकू. सर्वप्रथम आपण हे मान्य करु या की, मी वर नमूद केलेले दोनही दावे अतिरजित असून शकतील. मला ठामपणे वाटते की, विवेकवादाची आपल्याला कधी नव्हे एवढी गरज आहे, असे म्हणणे व्यापक अर्थाने बरोबर आहे पण या विधनाला मला मुरड घालायची आहे. जर हे विधान अतिरंजित वाटत असेल, तर हे जग भूतकाळात अधिक विवेकी होते व आज अधिक विवेकशून्य आहे असे चित्र कुणीही व्यक्ती रंगवू शकेल. एवढे असूनही आपल्यात बऱ्याच काळापासून फार मोठया प्रमाणात विवेकशून्यता वसत राहिली आहे. आणि काही वेळा याचे भयानक परिणामही आपल्याला भोगायला लागलेले आहेत.

आपल्याला विवेकवादाची कधी नव्हे एवढी आज गरज आहे. विवेकवाद जो मानवतावादाशी अतूटपणे जोडला गेलेला आहे व जो तातडीच्या समस्या सोडविण्याकडे वळविला जाईल व ज्याचा प्रत्येक व्यक्तीच्या सुखाकरीता व भरभरराटीकरिता लाभ होईल. आपल्या तर्काच्या शक्ती परिपूर्ण नाहीत. पण एकत्रितपणे काम करुन आपण आपल्या पूर्वग्रहांवर व उणिवांवर मात करु शकतो. आपण कदाचित विवेकी प्राणी नसूही. पण आपण बव्हंशी विवेकी जागतिक संस्कृती बनू शकतो. केवळ मानवी समाजच नव्हे, तर एकमेवाव्दितीय वसुंधरेवरील संपूर्ण जीवन व तिचे भवितव्य आपण आपल्या आयुष्यात विवेकवादाचा कसा कैवार घेतो यावर अवलंबून असेल. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या त्रिदशकपूर्तीनिमित मुंबई येथे झालेल्या तीन दिवसीय परिषदेत मानवतेच्या विकासासाठी विवेकवाद या आंतरराष्टीय संमेलनात केलेल्या भाषणाचा संपादित सारांश.

जीवन निदान

कु. नेहा गवई बी.ए.भाग ३

''जीवनाला हा म्हणणे शिका''

आपण सर्वाशी तितकेच प्रेमळ असू शकतो, परंतु आपल्या प्रेमाची परतफेड करणाऱ्यासोबतच आपुलकी निर्माण होते.

प्रेम हे कधीही निवडक नसते, जसा सूर्यप्रकाश निवडक असू शकत नाही कोणासाठी वेगळा पाऊस पडत नाही. एक्सक्लुसिव्ह असणे हा प्रेमाचा स्वभाव नाही. हा अहंकाराचा स्वभाव नक्कीच असू शकतो.

ज्या अहंकाराचे वर्चस्व नसते ते खरे नाते असते. त्यात आपण कोणत्याही प्रकारची प्रतिमा निर्माण करत नसतो. खऱ्या नात्यात आपले प्रेम समोरच्याला न विचारता उघडपणे वाहते.

या क्षणाला नेहमी हो म्हणावे. जे आहे त्याविरुध्द आपण एकजूट व्हावे यापेक्षा निरर्थक आणि वेडेपणा काय असेल आयुष्याला हो म्हणायला शिका. आपल्या लक्षात येईल की, जीवन आपल्याविरोधात नाही, तर आपल्या बाजूने काम करु लागले आहे.

जीवन छोटया छोटया निर्णयांतून निर्माण होते

डॅरेन हार्डी यांचे 'द कंपाउंड इफेक्ट' हे पुस्तक स्वयंशिस्तीवर एक उत्तम मजकूर मानला जातो हार्डी या पुस्तकात स्पष्ट करतात की, गोष्टी एकमेकांशी संबंधित असतात आणि यशस्वी होण्यासाठी अनेक छोटया छोटया गोष्टी सुधाराव्या लागतात.

संधी वि. निवड

आपली नियती योगायोगाने नव्हे, तर आपल्या निवडीनुसार ठरते, आपल्या दैनंदिन जीवनात आपण घेतलेल्या निर्णयांमुळे आपले वास्तव निर्माण होत असते. एवढेच नाही, तर ते निर्णय आपले भविष्यही घडवतात. हे फक्त मोठया निर्णयांदद्दल नाही, तर आपण घेतलेल्या छोटया निर्णयांवरही बरेच काही अवलंबून असते. त्यामुळे आयुष्यात मोठया गोष्टी मिळवायच्या असतील तर काही छोटे सकारात्मक निर्णय घेतले पाहिजेत. हे निर्णय नंतर तो कंपाउंड इफेक्ट तयार करतील, ज्यामुळे आपल्याला यश मिळेल.

चांगल्या सवयी लावणे

आपल्या स्वाभावातील, वर्तनातील सवय ही अशी क्रिया आहे, जिची आपण वारंवार पुनरावृत्ती करत असतो व ती आपल्या स्वभावाचा एक भाग बनते. वर्तणूकशास्त्रानुसार, आपण

६६ दिवस काही केले तर ती सवय बनते. अशा वेळी चांगल्या सवयी लावल्या तर यश दूर नाही. याच्या उलटही खरे आहे. वाईट सवयीही आपला पराभव करु शकतात.

प्रतिभा पुरेशी नाही

जीवनात यश मिळवण्यासाठी प्रतिभा आवश्यक असते, पण ती पुरेशी नसते. यशस्वी होण्यासाठी यशाचा सराव करावा लागेल. चांगल्या सवयी लावून हे घडते शिस्त आणि सातत्य अंगी बाणवावे लागेल. थोडक्यात अशा सवयी विकसित करा, ज्या आपल्याला ध्येयाच्या जवळ नेतील.

जीवन सर्वात आधी

आधी जीवन निवडा मग करिअर अनेकदा लोक कोणत्या प्रकारचे जीवन जगायचे आहे याचा विचार न करता नोकरी निवडण्याची चूक करतात. ज्यात खरा आनंद मिळतो ते काम नेहमी आधी निवडले पाहिजे.

आपल्या निर्णयाचे फळ

आपला आयुष्यात काही गोष्टी मिळवायच्या असतील तर त्यासाठी अशी व्यक्ती असायला हवी,जी सहसा त्या गोष्टी आपल्याकडे आकर्षित करते. आजचे जीवन हे आपलेच प्रतिबिंब आहे तो आपल्या निर्णयांचा निव्वळ परिणाम आहे आपली स्थिती सुधारायची असेल तर क्षमता दृष्टीव कौशल्य यावर काम करावे.

काही सर्जशील करा

विध्वंसक वा आपली हानी करणाऱ्या सवयींच्या सापडयात सापडता तेव्हा स्वत:ला विचारा, आपल्याला जे करायचे आहे ते आपल्या यशात योगदान देईल का? नसल्यास त्याऐवजी काही सर्जनशील करा. कवेळ आपली क्षमता वाढवून आणि त्यांना प्रभावी बनवून आपल्या आवडीच्या गोष्टी आपल्याकडे आकर्षित करु शकाल.

आपल्या मनावरील धूळ दररोज झटका

कु. प्रज्ञा इंगळे बी.ए. भाग३

२०२२ ला निरोप द्या. निरोप म्हणजे एक क्लोजन. मनात आलेले सर्व विचार निर्माण झालेल्या भावना, आपण धरुन ठेवलेल्या काही गोष्टी सोडून द्या. काही परिस्थिती बदलता येत नाही, पण भावना बदलता येतात. आपल्याला वेदना देणाऱ्या भावनिक नमुन्यांना निरोप घ्या. हेच या वर्षाला निरोप देणे आहे.

नवीन वर्षाच्या शुभेच्छा आणि या वर्षाला निरोप दया. आपण परिस्थिती बदलू शकत नाही परंतु आपण त्यांच्याबद्दल विचार करण्याचा आणि अनुभवण्याचा मार्ग बदलू शकतो, जेणेकरुन या नवीन वर्षाची सुरुवात आशीर्वादाने करता येईल. म्हणूनच ते आज निश्चितपणे केले पाहिजे. क्लोजर आणि ब्लेसिंग म्हणजे निरोप आणि शुभेच्छा हे आपण ३६५ दिवस पूर्ण झाल्याबद्दल करणार नाही अशी प्रतिज्ञा करावी लागेल. वर्ष संपेल त्या दिवशी आपण जुन्या वर्षाच्या भावना आणि विचारांना बंद केले पाहिजे. आशीर्वाद आणि शुभेच्छांसह नवीन वर्षाची सुरुवात करावी. हे फक्त वर्षाच्या शेवटी नसावे. आजपासून एक छोटीशी सवय लावा. ही सवय आगदी छोटी सांधी आहे, पण त्यात जादुई शक्ती आहे. जादुई शक्ती म्हणजे ती आपली मानसिक स्थिती पूर्णपणे बदलू शकते. आपल्या भावना बदलू शकतात. त्याचा आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो व आपले संबंध खूप गोड होतील आज ही छोटीशी सवय अंगीकारली तर प्रत्येक दिवस आपल्यासाठी नवीन असेल.

दररोज झोपण्यापूवी क्लोजर करा, त्या दिवसाचा निरोप घ्या. आणि दररोज पुढील दिवसासाठी शुभेच्छा आशीर्वाद दया. म्हणजे दिवसभरात अनेक गोष्टी येतात. कधी काही गोष्टी येतात पण गोष्टी, परिस्थिती, माणसे रोज सारखीच असतात. पण, आपण रोज एक प्रतिक्रिया निर्माण करतो. त्या प्रतिसादातून एक पॅटर्न तयार होऊ लागतो. दिवसभर आपल्याला सोयीस्कर नसलेल्या विचार किंवा शब्द किंवा वर्तनातून जात असाल त्यांना आपण नकारात्मक म्हणणार नाही. आपले बरेच विचार आणि शब्द नकारात्मक नसून अस्वस्थ असतात. ते आतील शक्ती कमी करतात. झोपण्यापूर्वी त्यांना बंद करावे. आज आपण याची खात्री करुन घेतली पाहिजे की, ही रोजची सवय लावू. आज दिवसभरात माझ्या मनात कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा कोणत्याही व्यक्तीबद्दल असे विचार निर्माण होतात की ते असे का आहेत, ते हे का करतात, त्यांनी हे करु नये, कोणी असे का करते, माझ्याबाबत हे का होते माझ्याबाबत पुन:पुन्हा का घडते हे माझ्या नशिबात का लिहिले आहे, मी एवढी मेहनत का करु तरीही यश मिळत नाही. इतर खप आनंदी आहेत, ते खूप यशस्वी आहेत. माझ्याबाबत असे का ही एक लांबलचक विचारांची साखळी आहे.

आपण त्याच निगेटिव्ह पॅटर्नने झोपलो, म्हणजे झोपण्यापूर्वी आपण तो विचार बदलला नाही, ती धूळ साफ केली नाही, तर ते विचार सुप्त मनात सतत धावत राहतात. वर आसलेली ती धूळ ती

वेदना खोलवर जाते. ती त्याच दिवशी झोपण्यापूर्वी झटकली तर तिचा थोडासा परिणाम होईल. त्या विचाराला आपण निरोप देत आहोत व पुढच्यासाठी आशीर्वाद निर्माण करत आहोत. तसेच दररोज आपण घराची शरीराची स्वच्छता करतो. आपण रोज थोडी घाण धूळ साफ करतो, पण मनाची धूळ झटकत नाही आणि ही धूळ हळूहळू एक डाग बनते आणि आपण तो घेऊनच झोपतो.

दृष्टिज्ञान

कु. सर्वज्ञा देखमुख बी.ए. भाग १

मानवाच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानेंद्रियांमध्ये डोळयांना खूपच महत्व आहे. डोळयांमुळे होणारे ज्ञान प्रतिमांच्या स्वरुपात असल्यामुळे त्रिमितिय आकलन होण्यास मदत होते.यात केवळ वस्तूंचा आकारच दिसत नाही तर त्याचा रंग, हालचाल आणि आकारात होणाऱ्या बदलांचेही ज्ञान होते. आकाराच्या बाबतीत हे ज्ञान केसाच्या जाडीपासून ते प्रचंड आकाराच्या आकाशगंगेपर्यंत विस्तारलेले असते. अगदी कमी तीव्रतेच्या प्रकाशापासून तीव्र प्रकाशाचा उपयोग आपण पाहण्यासाठी करु शकतो. डोळयांमुळे आपल्या समोरचा आणि बाजूचा मिळून १२० अंशाच्या कोनातील परिसर आपण पाहू शकतो. उत्क्रांतीच्या काळात या ज्ञानेद्रिंयाचा झालेला विकासही तितकाचा उद्‌बोधक आहे. वर्णपटातील किरणांची लांबी अगदी एक अब्जांश मीटर पासून काही किलोमीटर एवढी असू शकते. यातील चारशे अब्जांश मीटर ते सातशे अब्जांश मीटर एवढा भागच प्राणी पाहण्यासाठी वापरतात. त्याची सुरुवात एकपेशीय प्राणी अमिबापासून होते. अमिबाच्या पेशी आवरणावर रंगांना प्रतिसाद देणारे रंगद्रव्ये प्रकाशाचे शोषण करातात. त्यामुळे पेशी आवरणामधील प्रथिनांच्या रचनेत बदल होतो. या बदलांचे पर्यावसान हालचालीत होते. याचा उपयोग करुन अकमबा प्रकाशापासून दूर जातो. अमिबा हा एकपेशीय प्राणी असल्यामुळे त्यात स्वतंत्र चेतापेशी नसते. बहुपेशीय प्राण्यांमध्ये चेतापेशी आणि रंगद्रव्य एकत्र येऊन प्रकाशाव्दारे परिसराचे आकलन करणारी संस्था विकसीत झाली डोळा विकसीत झाल्याचा पुरावा किटकांमध्ये मिळतो. किटकांमध्ये दोन प्रकारचे डोळे आढळतात. सामान्य डोळा आणि संयुक्त डोळा असे त्याचे प्रकार असतात. झुरळामध्ये सामान्य डोळा प्रकाशाच्या तीव्रतेचे मापन करुन संयुक्त डोळयांची संवेदन क्षमता नियंत्रित करतो. संयुक्त डोळयांची अनेक वेशिष्टये आहेत. या डोळयात अनेक घटक असतात. प्रत्येक घटक स्वतंत्रपणे प्रतिमा निर्माण करतो. या सर्व प्रमिांचे एकत्रीकरण मेंदूमध्ये होऊन सलग प्रमिा कशी निर्माण होते, हे अद्याप समजलेले नाही हा डोळा डोक्याच्या मानाने मोठा असतो. या डोळयामुळे झुरळ दोनशे सत्तर अंशक कोनातील दृष्य पाहू शकतात. मासे, सरपटणारे प्राणी आणि पक्ष्यांमध्ये मानव सदृष्य डोळयांचा विकास झालेला दिसतो. यातही या प्राण्यांचे डोळे मानवापेक्षा वेगळे असतात. मानवी डोळयांची रचना ही नेत्रपटल, बुबुल, भिंग आणि दृष्टिपटल अशी असते. दृष्टिपटलातील पेशींनी चेतातंतू जोडलेले असतात. हे चेतातंतू दृष्टिपटलांतील पेशी संवेदना मेंदूपर्यंत पोहोचवतात. प्राण्यांच्या डोळयांची जी वैशिष्टये असतात. त्यामुळे त्यांचे वेगळेपण सिध्द होते.

मानवी डोळयामधील नेत्रपटल आणि भिंग प्रकाशाचे वक्रीभव घडवून आणतात. प्रकाश ज्यावेळी एका घनतेच्या माध्यमातून दुसऱ्या घनतेच्या माध्यमात जातो, त्यावेळी त्याचे वक्रीभ्वन होते जसे हवेतील थरांची घनता बदलल्यास वक्रीभवन होऊन मृगजळ दिसते. तसेच ग्लासातील पाण्यात पेन्सिल ठेवली तर ती वाकडी दिसते. प्रकाश हवेतून नेत्रपटल आणि भिंगामध्ये गेल्यास वक्रीभवन होऊन दृष्टीपटलावर प्रतिमा निर्माण होते. याचे कारण हवा आणि भिंग यांची क्षमता भिन्न असते. पाण्याखाली जाऊन डोळे उघल्यास निट दिसत नाही. करण पाणी आणि भिंगाची घनता सारखीच असते. काही मासे आपल्या भिंगाची घनता हवी तशी बदलू शकतात. यामुळे ते अर्धा डोळा पाण्याच्या वर आणि अर्धा पाण्याच्या खाली ठेवून पाणी आणि हवेतील दृष्य पाहू शकतात.

डोळे झाकल्यानंतर एकग्रता वाढते. मेंदूमध्ये जी स्पंदने निर्माण होतात, त्यातील अल्फा स्पंदनांचे प्रमाण डोळे बंद केल्यानंतर वाढते. डोळे झाकल्यानंतर प आणि फ याच्या उच्चारातील फरक स्पष्टपणे कळतो. याचाच अर्थ डोळयांव्दारे मेंदूकडे जाणाऱ्या संवेदना न गेल्यास श्रवण इंद्रिय अधिक संवेदनशील बनते. अंध व्यक्तींच्या बाबतील याचा प्रत्यय येतो. ध्वनी संवेदनाच्या आधारे ते सभोवतालच्या परिस्थितीचा अंदाज घेतात. त्यामुळेच अंधव्यक्ती एकटया प्रवास करु शकतात. याउलट डोळे डघडे असूनही दृष्टिभ्रमहोतो. मृगजळ दिसणे एकाच चित्रात तरुणी आणि वृध्द स्त्रीचा भास होणे ही त्याची काही उदाहरणे सिझोफ्रेनियासारख्या व्याधींमध्ये दृष्टिभ्रम होतात. त्याचप्रमाणे अंमली पदार्थांच्या सेवनानेही दृष्टिभ्रम होऊ शकतात. ज्या व्यक्तीमध्ये फेफरे येण्याचा विकार आहे, अशा व्यक्तींनी हालणारे दिवे पाहिल्यास फेफरे येण्याची शक्यता असते. अशा या डोळयांचे दान म्हणजे नेत्रदान केल्याने दाने केलेल्या व्यक्तीस काहीच वेदना होत नाही. नेत्रदानाविषयी समाजात अजूनही काही गैरसमज आहे. आपण हया असतांना डोळयांची निगा राखून त्याचा उपयोग करणे आपले कर्तव्यच आहे. मरणोत्तंर नेत्रदान करुन दुसऱ्याला दृष्टी प्राप्त करुन देणे आपले परमकर्तव्य आहे, याची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी.

शिवरायांची जोखीम पत्करण्याची क्षमता

कु. स्नेहल साखरे बी.ए. भाग २

एकीकडे आदिलशाही शिवाजींसकट मोगलांचे लचके तोडत होती, तर दुसरींकडे दलेरखानाचे मन शिवाजींबद्दल अधिकाधिक कलुषित होत होते. आता तो उघड डघड राजांना संपण्यिाची भाषा करु लागला. पन्हाळगडाकडून निसटण्याचा राजांचा डावही फसला होता. मिर्झाराजांना शिवाजीराजांच्या जीविताची काळजी वाढू लागल्याने, त्यांना स्वराज्यापासून दूर करण्याची नामी शक्कल मिर्झाराजांनी शोधून काढली. ती म्हणजे औरंगजेब शिवाजी भेट, जी जयसिंहाच्या मुत्सद्देगिरीची एक मोठीच झेप होती. उपलब्ध कागपत्रांवरुन असे लक्षात येते की, जयसिंहाने शिवाजीला दक्षिणेच्या राजकारणापासून दूर ठेवण्यासाठी औरंगजेबाला पत्र लिहून त्याची

शिवाजीची भेट घ्यावयाची अनिवार्यता पत्राव्दारे कळविली होती पण शहाजहानच्या मृत्यूमुळे औरंगजेब या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊ शकला नव्हता. अर्थात, मोगलांचा शिवाजीसारखा एक मोठा शत्रू, जो आता तहान्वये नरमला आहे, तो औरंगजेबाला भेटायला येणे म्हणजे दरबारातील जयसिंहाचे वजन वाढणार होते. ज्याला आजपर्यंत कुणी नमवू शकले नाही अशा शिवाजीला जायसिंहाने केवळ नामविलेच नव्हते, तर जे म्हणेल ते करावयास भाग पाडले होते. औरंगजेबाने शहंशाह या नात्याने शिवाजीची भेट घेणे म्हणजे स्वत:कडे मोठेपणा घेण्यासारखे होते प्रत्यक्ष भेटीमध्ये शिवाजीवर अजून दबाव आणून बरेच काही हस्तगत किंवा मान्य करुन घेण्यासारखे होते. म्हणजे इथे जयसिंह व औरंगजेब या दोघांचाही फायदा होताना आपल्याला दिसतो. ही भेट जयसिंह, शिवाजी आणि औरंगजेब या तिघांच्याही आयुष्यावर निर्णायक परिणाम करणारी अशी ठरणार होती. मुळात ही भेट दिल्लीमध्ये व्हावयाची होती, पण शहाजहानच्या मृत्यूमुळे औरंगजेब उरला होता दिल्लीएवढयाच एका वजनदार शहरामध्ये, ज्याचे नाव होते मुस्तकीर-उल-खिलाफत अकबराबाद म्हणजे आग्रा. पण, एक प्रश्नअनुत्तरित राहतो की, राजे इतकी मोठी जोखीम पत्करण्यासाठी का तयार झाले राजांच्या मनात असे काय घाटत होते की, राजे आपले सर्वस्व पणाला लावायला तयार झाले होते. एखादी मोठी मसलत यातून साकार होणार होती का राजांच्या मनात काही गूढ योजना होती का असे अनेकानेक प्रश्न आ वासून उभे होते.

जे कारण वरपांगी दाखविण्यात आले ते असे होते की, पुरंदरचा तह राजे आणि जयसिंह यांच्यात झाला. त्यावर बादशहाशी भेट घेऊन अंतिम शिक्कामोर्तब करण्यासाठी म्हणून औरंगजेबाची भेट. पण, पडद्यामागे काहीतरी मोठे नाटय आकार घेत होते. जयसिंह दख्खनचा माहितगार होता, त्याला इथल्या कठीण प्रदेशाची व जटिल राजनैतिक गुंत्याची कल्पना होती. त्यामुळे दख्खन घेण्याचे कठीण काम मोगलशाहीला न करावे लागता परस्पर शिवाजीने केले तर मोगलांचे श्रम मोठया प्रमाणात वाचणार होते. त्यामुळे शिवाजीला दख्खन काबीज करण्यासाठी उभे करावे व त्याच्यामागे बादशाही ताकद लावावी, असा जयसिंहाचा डाव दिसून येतो. सर जदुनाथ सरकार यांच्या मते, शिवाजीला मधाचे बोट लावावे म्हणून जयसिंहाने थेट दख्खनच्या सुभेदारीचे प्रलोभन दाखविले असण्याची शक्याता नाकारता येत नाही. जरी या गोष्टीचे सूतोवाच जयसिंहाने औरंगजेबाला अथवा शिवाजीला लिहीलेल्या पत्रात कुठे दिसून येत नसले, तरी असे काही घडणे संभवनीय आहे. दहा वर्षे सातत्याने प्रयत्न करुनही दख्खन काबीज होत नाहीसे पाहता शिवाजीसारखा लढवय्या आपल्याला लाभला तर दख्खन सहजासहजी घेता येईल असा जयसिंहाचा मानस होता. कदाचित शिवाजीराजांनाही ही एक मोठी उपलब्धी वाटली असावी. दख्खनची सुभेदारी जर आपल्याला मिळाली तर मोगलांचीच साधनसामग्री अन् पैसा वापरुन आदिलशाही व कुतुबशाही यांची चिता पेटवावी. औरंगजेबाच्या वतीने अख्खी दख्खन आपल्याकडे घेऊन हळूहळू आपल्या विचारांची माणसे उभी करावी अन् भविष्यात त्यांचा उपयोग करुन उतरेवरच एल्गार करण्याची थोरली मसलत तर राजांच्या मनात आकार घेत नव्हती ना. मुरुड जंजिरा हे या किल्याचे नाव

नाही जझीरा म्हणजे बेट किल्याचे नाव होते मेहरुब हा स्वराज्याच्या अन् महाराजांच्या दृष्टीने दुसरा कळीचा मुद्दा होता. राजांनी अनेकदा जंजिरा घेण्याचे निकराचे प्रयत्न केले होते, पण ते सगळे व्यर्थ ठरले होते. आता या भेटीचे निमित्त साधून जंजिराच आपल्याकडे खेचण्याची व पश्चिमी तट निर्धास्त करण्याची एक नामी संधी चालून आल्यासारखे डाव कसे पडतात. हे येणारा काळच ठरविणार होता.

नदीमाय

कु. अनुष्का कडू बी.ए. भाग २

तुझ्या मनावरचे ओरखडे

त्या आभाळाला उशिरा कळले..

ऊन वाऱ्याची चाहूल देऊन

तुझ्या नजरेत ते आभाळ पडले

किती विनवणी त्या आभाळाला

आणि गळ घालावी लागते..

तेव्हा कुठे वेदना तुझी

त्या आभाळाला कळू लागते..

तहानलेले तुझे काठ बघ

कसे तृप्त होत आहेत..

नदीमाय तुझे अंतरंग

तुप्त तृष्णा अनुभवत आहेत..

थेंब थेंब बघ प्राशून

तुझा प्रवाह मोकळा होईल..

त्या खडकावर तुडुंब वाहून

तुझी माया धन्य होईल.

किती काळ तो विरह नुसता

मनावर ओरखेडे बोलत होता..

केविलवाण्या डोळयाआड आभाळ नुसतं भरवत होता..

आता नदीमाय तुझे काठ बघ तुडुंब वाहत आहेत..

बघ ते आभाळ भरल्या प्रवाहात

तुझ्यासाठीच तर रडत आहेत..

सांध्यसमयीची साथ

कु. अश्र्वीनी मेहरे बी.ए. भाग ३

आपण महापुरुषांना अवतारी पुरुष करुन टाकतो. त्यामुळे त्यांच्या विचारांप्रमाणे कृती करण्याची आपली जबाबदारी संपते. मात्र ते आपल्यासारखे माणूस असतात. सामान्य माणसाच्या साऱ्या दु:ख-अडचणी यांना तोंड देत त्यांना असामान्यत्वाकडे वाटचाल करावी लागते. या सर्व वाटचालीत त्यांना खऱ्या अर्थाने साथ देते ती त्यांची सहचारिणी बाहेरच्या जगातील सर्व अपमान, पराभव सोबत घेऊन महापुरुष घरात येती, तेव्हा इतर कोणाही पुरषाप्रमाणे त्याला हवी असते एक समंजस सोबत त्याच्या दु:खावर फुंकर घालणारी, त्याच्या आत्मविश्वासाला उजाळा देणारी. त्याला आपल्या दुखऱ्या जागा दाखवता येतील, मन मोकळे करता येईल असा आश्वासक कोपरा तो आपल्या घरात शोधत असतो आणि सहचारीणी प्रेमाच्या सावलीत त्याला तो सहचारीनीच्या सापडतो. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असे म्हणतात.

महापुरुषामागे तर त्याचे निव्वळ माणूसपण व महापुरुषपण, दोन्ही समजून घेणारी महासमंजस स्त्री उभी असणे आवश्यक असते. नाही तर आपली दु:ख, वेदना आणि कर्तबगारी यांचा डोलारा त्याला एकटयाला पेलावा लागतो. आयुष्याच्या उत्तरार्धात हा भार पेलणे पुरुषाला अतिशय कठीण होते. तेव्हा त्याच्या शारीरिक क्षमाता कमी होत जातात, मनही अधिक हळवे झालेले असते. त्यामुळे पुरुषाला सोबतीची सर्वात जास्त गरज असते ती म्हातारपणी. तरुणपणी शरीरात व मनात रग असते. हिंडणे फिरणे, प्रवास, आहार यावर बंधने नसतात. त्या वयात अल्पकाळ सोबत लाभली तरी फारसे बिघडत नसते. मात्र आयुष्याच्या संध्यासमयी ही सारी समीकरणे विषम होतात, तेव्हा खऱ्या अर्थाने गरज असते ती पुरुषाला आश्वस्त करणाऱ्या, समंजस व दृढ आधाराची पुरुषाला हा आधार या वयात मिळाला नाही, तर तो पार विकल होतो. तुमच्या आजूबाजूला पाहिले तर अशी अनेक उदाहरणे तुम्हाला दिसू शकतील. या संदर्भात आपण अनेक महापुरुषांची उदाहरणे पाहू शकतो.

अनुक्रमणीका

अ.क्र.	नाव
१	वृक्षाचे मनोगत
२	स्वच्छतेचे महत्व
३	पर्यावरणाचा होणारा ऱ्हास
४	खेळाचे महत्व
५	डॉ. बाबासाहेब आंबेडकर
६	पाखरं
७	सूर्य संतापला तर.....
८	सुवर्ण कन्या : भगवानी देवी
९	म. जोतिराव फुले
१०	भारतातील सर्वात पहिली स्त्री
११	भारत जोडो यात्रा
१२	स्वामी विवेकानंद
१३	प्राजक्ताची अस्मिता:दैदिप्यमान सावित्रीबाई फुले
१४	बहिणाबाईच्या कवितेतील संसारगाडा
१५	समाजप्रबोधनाचा सूर्य संत गाडगेबाबा
१६	स्व. बाबासाहेब सांगळूदकर : एक दानशूर व्यक्तिमत्व
१७	शकुंतला परांगदा झाली
१८	पी.टी. उषा आख्यायिका आणि आव्हानं !
१९	बोलण्यातला वाढवू गोडवा
२०	शिक्षणातून माणूस घडवू पाहणारा तत्वचिंतक
२१	गजर मराठीचा, अभाव ठोस कृतीचा
२२	आय हेट माय टीचर
२३	अंतराळात मानवी रोबोट
२४	मानसी
२५	मृत्यूजवळचा अनुभव
२६	निरागसता सांभाळा
२७	हेल्थ लायब्ररी
२८	राज्यकर्त्यांच्या तावडीत घुसमटतेय मराठी भाषा
२९	देशसेवा
३०	योग्य तरुण
३१	अस्थिरतेच्या कडयावर
३२	मानवतेसाठी विवेकवाद
३३	जीवन निदान
३४	आपल्या मनावरील धूळ दररोज झटका

३५	**दृष्टिज्ञान**
३६	**शिवरायांची जोखीम पत्करण्याची क्षमता**
३७	**नदीमाय**
३८	**सांध्यसमयीची साथ**